शुक्रवार, २७ ऑक्टोबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी  दैनिक
वर्ष - ०३  अंक - ८२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 27 OCT. 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-82 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5


# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे नाव फक्त राजकारणासाठी वापरले

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : उपमुख्यमंत्री अजित पवारांसमोर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी : 2014 च्या आधी महाराष्ट्रातील एक नेते अनेक वेळा देशाचे कृषिमंत्री राहून गेले. मात्र त्या काळात शेतकऱ्यांचे मोठे हाल होते. शेतकऱ्यांसाठी कुठलीच योजना काम करत नव्हती. शेतकऱ्यांना अनेकदा हेलपाटे मारावे लागत होते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे नाव फक्त राजकारणासाठी वापरले गेले, मात्र 2014 नंतर हे चित्र बदलले. आपल्या सरकारने शेतकऱ्यांच्या सशक्तीकरणासाठी काम केले, असे सांगत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोरच राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यावर हल्लाबोल केला.**



गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी अहमदनगरच्या शिर्डी दौऱ्यावर होते. शिर्डीजवळील काकडी गावात सार्वजनिक सभा आयोजित करण्यात आली होती, यावेळी ते बोलत होते. त्यांनी शरद पवार यांच्यावर अजित पवार त्यांच्यासमोरच टीका केल्याचे दिसून आले. मोदी म्हणाले की, महाराष्ट्रातील एक नेते अनेक वर्ष केंद्र सरकारमध्ये कृषी मंत्री म्हणून काम करत होते. व्यक्तिगतरीत्या मी त्यांचा सन्मान करतो, मात्र सात वर्षांच्या आपल्या कार्यकाळात त्यांनी देशभरातल्या शेतकऱ्यांकडून साडेतीन लाख कोटी एमएसपीवर धान्य खरेदी केले, परंतु आपल्या सरकारने सात वर्षात साडे तेरा लाख कोटी रुपयाच्या एमएसपीवर धान्य खरेदी केल्याचे नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरवात मराठीतून करत शिर्डीच्या या पावन भूमीला माझे कोटी कोटी नमन म्हणत भाषणाला सुरवात केली. मोदी यावेळी म्हणाले की, पाच वर्षांपूर्वी या पवित्र मंदिराला शंभर वर्ष पूर्ण झाले होते, त्यावेळी मला दर्शनाची संधी मिळाली होती. यावेळी सुरवातीलाच त्यांनी कीर्तनकार बाबा महाराज सातारकर यांना आदरांजली देखील वाहिली. ते म्हणाले की, आज सकाळी देशाचे अनमोल रत्न, वारकरी संप्रदायाचे वैभव बाबा महाराज सातारकर यांचे निधन झाले. कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून ज्यांनी जगाला मार्गदर्शन केलं, त्यांच्या सहज वाणीतुन निघणाऱ्या 'जय जय रामकृष्ण हरि'ने एक वेगळाच आनंद मिळत होता. मात्र आज त्यांचे देहावसान झाले, त्याबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली!

### आता एक थेंबही वाया घालवू नका....

मोदी पुढे म्हणाले की, देशाच्या कल्याणासाठी आम्ही काम करत असून मागील दहा वर्षांत देशातील नागरिकांना निराश केले नाही. देशातील गरीब परिवारांना पुढे जाण्याचा योग येवो हे आमचे ध्येय आहे. गरीब कल्याणासाठी सरकारचा बजेटही वाढत आहे. आयुष्यमान भारत योजनेंतर्गत गरीबांना मोफत उपचारांसाठी 70 हजार कोटी खर्च केले असून गरीबांच्या घरांसाठीही सरकारने 40 लाख कोटी रूपये खर्च केले. हर घर जल पोहोचवण्यासाठीही आतापर्यंत 2 लाख करोड रूपये खर्च करण्यात आले आहेत. महाराष्ट्र सरकारने नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरू केली. शेतकऱ्यांना आत एकूण 12000 रूपये मिळतील. आपल्याला शेतकऱ्यांच्या नावावर मतं मागून थेंब थेंब पाण्यासाठी तरसवले आहे. महाराष्ट्राला 5 दशकांपासून ज्या निळवंडे धरणाचे वेध होते, ते काम आज पूर्ण झाले. ज्या कामांचं भूमिपूजन मी केलं, त्याच उद्घाटन करण्याचा योगही मलाच आला. आज जेव्हा या डॅममधून पाणी सुरू झाले, हा परमात्म्याचा प्रसाद आहे. आता एक थेंबही वाया घालवू नका, असे आवाहन शेतकऱ्यांना करत आम्ही चांगल्या नियतीने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काम करत असल्याचे मोदी यांनी स्पष्ट केले.

# ह.भ.प. बाबा महाराज सातारकर यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. बाबा महाराज सातारकर याचे आज पहाटे सहा वाजता निधन झाले आहे. ते ८८ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे अवघ्या महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय परंपरेतील व सातारकर फड परंपरेतील लाखोंच्या समुदायावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात त्यांच्या दोन मुली ह. भ. प. भगवती महाराज व रासेश्वरी सोनकर आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता नेरुळ येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

५ फेब्रुवारी १९३६ रोजी साताराच्या नामवंत गोरे सातारकर घराण्यात त्यांचा जन्म झाला होता. वास्तविक निळकंठ ज्ञानेश्वर गोरे हे त्यांचे मूळ नाव होते. मात्र, पुढे त्यांच्या कीर्तनाला मिळालेल्या व्यापक स्वीकृतीतून त्यांना 'बाबा महाराज सातारकर' हे नाव मिळालं ते आयुष्यभर त्यांच्यासोबत राहिले. नेरूळच्या आगरी कोळी भवनासमोरच्या एका वसाहतीत ते वास्तव्यास होते. महाराष्ट्राला प्रदीर्घ अशी कीर्तनाची व ख्यातनाम कीर्तनकारांची परंपरा राहिली आहे. वारकरी संप्रदायातील प्रमुख कीर्तनकार फड म्हणून सातारकर घराण्याच्या फडाचे नाव मानाने घेतले जाते असे. गेल्या चार पिढ्यांपासून सातारकरांच्या घरात प्रवचन आणि कीर्तनाची परंपरा होती. स्वतः बाबा महाराज सातारकरांनीही ही परंपरा मोठ्या अभिमानाने जपली आणि वाढवली होती! आता त्यांच्या कन्या ह.भ.प. भगवती महाराज ही परंपरा पुढे चालवत आहेत. बाबा महाराज सातारकर यांनी जसे वकिलीचे शिक्षण घेतले होते, तसेच त्यांनी शास्त्रीय संगीताचेही शिक्षण घेतले होते. ११व्या वर्षांपासूनच त्यांनी पुरोहितबुवा, आग्रा घराण्याचे लताफत हुसेन खाँ साहेब यांच्याकडून शास्त्रीय गायनाचे धडे घेतले होते. १९६२ साली आप्पा महाराज सातारकर यांच्या निधनानंतर सातारकर घराण्याची कीर्तन-प्रवचन परंपरा बाबा महाराज सातारकर यांनी पुढे चालू ठेवली. भंडारा डोंगर, देहू, त्र्यंबकेश्वर, पंढरपूर अशा महाराष्ट्रातील विविध ठिकाणी बाबा महाराज सातारकर यांनी कीर्तन सप्ताहांचे आयोजन केले. या सप्ताहांना लाखो भाविकांची मोठी गर्दी होत असे. बाबा महाराज सातारकर यांच्या निधनावर राजकीय वर्तुळातू शोक व्यक्त करण्यात येत आहे. सर्वपक्षीय नेत्यांनी एक्सवर (ट्विटर) आपल्या भावना व्यक्त करताना बाबा महाराज सातारकर यांना आदरांजली वाहिली आहे.

# आता पर्याय सांगा : उद्धव ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठी छत्रपती शिवरायांची शपथ घेतली, त्याचा आदर आहे. पण केवळ भावनिक होऊन उपयोग नाही, पर्याय सुद्धा सांगावा, असे ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते, कुरुंदवाडचे माजी नगराध्यक्ष चंगेज खान यांनी ठाकरे गटात पक्ष प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी सध्याच्या राजकीय परिस्थिवर भाष्य केले.

जे आऊट गोइंग आहे ते कशासाठी बाहेर चाललेत ते दिसते. इनकमिंग सत्ता आणण्याच्या दिशेने होत आहे. आऊट गोइंग सत्तेत जाण्यासाठी झाले आहे. लढवय्या माणसे माझ्यासोबत येत आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी मराठा आरक्षणावर भाष्य केले. उद्धव ठाकरे म्हणाले, मी त्यावर बोललो आहे. खूप त्यावर बोलून गोंधळ घालू नये. नेमकेपणाने बोलून मराठा समाजाला न्याय मिळवून दिला पाहिजे. धनगर, आदिवासी यांना सगळ्याला विश्वास घेऊन निर्णय घ्यावा. लोकसभेत विशेष अधिवेशन घेऊन या सगळ्याचा सर्व समावेशक निर्णय घ्यावा मुख्यमंत्र्यांनी शपथ घ्यावी, पण पर्यायही सांगावा.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला. मराठा आरक्षणासाठी मुख्यमंत्र्यांनी शपथ घ्यावी पण पर्याय सुद्धा सांगावा. शपथ घेऊन भावनिक केले जाते. शपथेचा आदर आहे, पण मार्ग काय?, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्रात आहेत. त्यांचे स्वागत आहे. मोदींनी जरांगे पाटील यांची भेट घेऊन मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवावा ही विनंती आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.


# इस्त्रायल-हमास युद्ध भारताच्या ड्रीम प्रोजेक्टमुळे ?


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्धाबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी मोठा दावा केला आहे. जो बायडन म्हणाले की, नुकत्याच नवी दिल्लीत झालेल्या G-20 शिखर परिषदेदरम्यान इंडियन मिडिल ईस्ट युरोप कॉरिडॉरची घोषणा करण्यात आली होती. मला खात्री आहे की, ही घोषणाच हमासने इस्त्रायलवर केलेल्या दहशतवादी हल्ल्यासाठी कारण ठरली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन म्हणाले की, अमेरिका देश चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह चा मुकाबला करण्यासाठी G7 सदस्य देशांसोबत काम करत आहे, ज्यात पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या नेटवर्कद्वारे सौदी अरेबियाला युरोपशी जोडणारा रेल्वे-रोड प्रकल्प असणार आहे. मला खात्री आहे की, हमास आणि इस्त्रायल यांच्यातील तणावाच्या कारणांपैकी एक कारण हेदेखील आहे. माझ्याकडे याबाबत कोणताच ठोस पुरावा नाही. परंतु, माझ्या मनाला ठाऊक आहे की, इस्त्रायलसाठी प्रादेशिक एकात्मतेच्या दिशेने काम केल्यामुळेच हमासने हा हल्ला केला आहे. आम्ही ते काम अजिबात अर्धवट सोडू शकत नाही, असे मोदी म्हणाले आहेत. 7 ऑक्टोबर रोजी हमासने इस्त्रायलवर हल्ला केला होता. या हल्ल्यात आतापर्यंत 1400 लोकांचा मृत्यू झाला आहे.




## उगवतीचे रंग





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

## ऐसी अक्षरे रसिके



आपल्या मनातील अमूर्त विचार आणि भावनांचे प्रतिबिंब अक्षर रूपात समोरच्या कागदावर किंवा स्क्रीनवर उमटते. मानवाची जसजशी प्रगती होत गेली तसतशी त्याने आपलं बोलणं व्यक्त करणारी प्रतिकात्मक अक्षरं शोधून काढली असावीत. त्यातूनच लिपी तयार झाली. मानवाच्या लेखनकलेचा ' श्रीगणेशा ' झाला. श्रीगणेश ही विद्येची आणि बुद्धीची देवता ! लेखनाची सुरुवातच श्रीगणेशापासून झाली. महर्षी व्यासांनी जे एक लक्ष श्लोकांचं प्रचंड मोठा आवाका असलेलं महाभारत सांगितलं, ते लिहून घेणं काही येरागबाळ्याचं काम नव्हतंच. व्यासांनी ते न थांबता सांगितलं आणि गणपतीनं सुद्धा प्रचंड वेगानं ते अक्षरबद्ध केलं. आज आपण संगणकावर किंवा मोबाईलवर किंवा अन्य कोणत्याही माध्यमावर जेवढ्या वेगानं टाईप करतो, त्यापेक्षाही त्याचा ( गणपतीचा ) लिहिण्याचा वेग अधिक असावा. आज आपल्याकडे लिहिण्यासाठी कितीतरी वेगवेगळे पर्याय आणि साधनं उपलब्ध आहेत. पण पूर्वीचा मानव कशाकशाचा वापर करीत असेल ? अणकुचीदार दगड, झाडाची काडी किंवा डहाळी, पक्ष्याचं किंवा मोराचं पीस इ. आणि पुढे जसजशी प्रगती होत गेली तेव्हा बोरू, टाक, पेन्सिल, पेन इ. मग टाईपरायटर, संगणक इ. लिहिण्यासाठी तो पूर्वी भूर्जपत्र, कापड इ. चा वापर करायचा. मग पुढे कागदाचा शोध लागला. त्यापूर्वी मानवाने गुहेत विविध चित्रं काढली. पानाफुलांचे रंग भरले. अशा रितीने आधी चित्रलिपीचा जन्म झाला. लिपीचा शोध लागल्यावर पुढे त्याने दगडावर मजकूर कोरायला सुरुवात केली. त्यातूनच शिलालेखांचा जन्म झाला. राजेमहाराजांचा इतिहास नाणी, शिलालेख, आज्ञापत्र, बखरीच्या रूपाने उपलब्ध झाला. व्यापाऱ्यांना हिशेब लिहिण्याची सोय झाली. वैदिक वाङ्मय पूर्वी मौखिक स्वरुपात होते. लिहिण्याचा शोध लागल्यामुळे ते लिखित स्वरूपात आले. कल्पना करा की लेखनाचा शोध लागला नसता तर ! ते सगळे ज्ञान त्या त्या लोकांबरोबरच नाहीसे झाले असते. प्राचीन ज्ञानाच्या पायावर मानवाच्या पुढील प्रगतीची इमारत उभी राहिली.

## आनंदी पहाट



### आयुष्यातील सहप्रवासी हा प्रयास देणारा नसावा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक अथवा शारीरिकदृष्ट्या जरी एकटं आयुष्य जगणं एखाद्यानं पसंत केलं अथवा स्वीकारलं तरीही त्याला मानसिकदृष्ट्या काहीवेळा, काहीबाबतीत जाणवणारा एकलेपणा मात्र आंतरिक अस्वस्थता निर्माण करण्यास कारणीभूत ठरतो, मानसिक ताण-तणावाचा अनाकलनीय दबाव उत्पन्न होत राहतो. आपल्याला आयुष्य जगण्यासाठी सद्यःस्थितीत पैसाच लागतो, पण जीवन आजमावण्यासाठी कोणाचीतरी साथ, सोबत, संगत लागत असते. तुझं माझं जमेना, पण तुझ्याविना करमेना, अशी स्थिती असली तरीही आपल्याला मान्य होतं. आपल्यापैकी प्रत्येकाला सहजीवनाची गरज भासतेच. कदाचित, प्रत्येकाची तशी मानसिकता आयुष्यातील निरनिराळ्या टप्प्यांवर येत असेल. अर्थात, प्रत्येकाच्या मानसिक पातळींवर होत असलेल्या निरनिराळ्या स्थित्यंतरांवर ही गरज कमी-अधिक होत असेल. सहजीवन सकारात्मक आणि आनंदी करण्यासाठी साथ-सोबत करणाऱ्या प्रत्येकानं कर्तव्यापोटी स्वीकारलेली जबाबदारी समसमान घेतलेली असणं अभिप्रेत आणि अपेक्षित असतं. तशी जाणीव होणं महत्वाचं ठरतं. प्रत्येक व्यक्तीला सहजीवनाची गरज, ही मानसिक पातळीवर अधिक आवश्यक असते. सहजीवनाच्या प्रवासाचा तेव्हाच प्रयास वाटत नाही, जेव्हा सकारात्मक दृष्टीकोनातून तो केला जात असतो. आपल्या सुख-दुःखांत, आयुष्यातील चढ-उतरांत सह-प्रवासी देखील आपली साथ-सोबत करणारा असणं योग्य ठरतं. ती साथ-सोबत देखील जीवन के साथ भी; जीवन के बाद भी, अशीच असणं अभिप्रेत असतं. सकारात्मक सहजीवन जगता येणं ही केवळ कला नसून ते एक शास्त्र आहे, असं म्हंटलं तर वावगं ठरणार नाही. ह्या शास्त्रात संवाद, सहवास, सहभाग, सहकार आणि सम-भोग या बाबींचा कृतीशील विचार करावा लागतो, त्यांचा अंगीकार करणं आवश्यक ठरतं.



आधुनिक केसरी

**अंतरी स्मरून | विठोबाला ||**

आजी म्या पाहिला | चैतन्य सोहळा ||
घडो वेळोवेळा | संतसंग ||१||
नाही मज आस | आणिक सुखाची ||
साथ अभंगाची | राहो सदा ||२||
घेरले मायेने | होते आजवरी ||
भान थाऱ्यावरी | कैसे राहे ? ||३||
चूड म्या लावली | दुःखाच्या चितेला ||
सुख या चित्ताला | भारी वाटे ||४||
करावा संसार | नेकीने जपून ||
अंतरी स्मरून | विठोबाला ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

मग ते दुर्दशा सांगतां ।शंका बाधी ॥२८॥
ऐसिये कारागृहीं वस्ती ।नवमास बहु विपत्ती ।
नवहि द्वारें निरोधती ।वायो कैंचा तेथें ॥२९॥
वोका नरकाचे रस झिरपती ।ते जठराग्नीस्तव तापती ।तेणें सर्वहि उकडती ।अस्तिमांस ॥ ३०॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

माया लोक छोड़ाय कर, चेतन लोक निवास ।
सद्गुरु ताको जानिये, भक्ति मुक्ति तेहि पास ।।०८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल नवम अध्याय) ०२/०९/०८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जे आपल्या चेतन भक्ती द्वारे माया लोक म्हणजेच मृत्यू लोकापासून सोडवून चेतन मण्डलाची प्राप्ती करवून जीवन्मुक्त करतात, त्यांनाच सद्गुरू म्हणतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शारदीय नवरात्र (माळ सातवी)

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

देवी मातेची आयुधे भगवान शंकरांनी आपल्या शस्त्रसंभारातून देवी मातेला त्रिशूळ दिला. श्री, विष्णुंनी आपल्या चक्रातील काही तेज काढून एक नवीन चक्र तयार करून दिले. वरूण देवाने शंख दिला. अग्निने एक अजिंक्य व अचूक मारा करणारी दिव्य शक्ती दिली. पवन( वारा ) ने धनुष्यबाण दिले. इंद्र देवाने आपल्या बाणातील एक तेजस्वी बाण दिला. रणगर्जनेसाठी आपल्या ऐरावत हत्तीच्या गळ्यातील घंटा देवीला दिली. यमाने कालदण्डामधून ( काठी ) दण्डं वरूणाने पाशांकुश ( फास ) दिला. प्रजापतीने स्पटिकाची माळ दिली. ब्रम्हदेवाने देवीला कमंडलू दिला. सुर्याने देवीच्या त्वचेतील रोम छिद्रात आपली प्रकाश किरणे पसरवून तेज निर्माण केले. काळाने एक अजिंक्य तलवार व ढाल दिली. समुद्राने( क्षीरसागर ) दिव्य हार चूडामणी ,हातात रत्नजडित कांकणं आणि कानातील रत्नांनी जडवलेली कुंडले दिली. आभूषणामूळे रत्नांनी सजवलेली चंद्रकोर सर्व हातांना शुभ्र केयूर व पायात पवित्र नूपूरांची जोडी गळ्यात कंठा, मणिमाला प्रदान केल्या.

## प्रपंचात परस्परांशी प्रेमभाव कसा वाढेल

आधुनिक केसरी


निसर्गतःच प्रेम हे प्रत्येक व्यक्तीत आणि प्राणिमात्रांत असते. फार काय, प्रेमाशिवाय मनुष्यप्राणी जिवंत राहू शकणार नाही. प्रेमाने सर्व जग वश करून घेता येते. प्रेम ठेवण्यात पैसा खर्च होत नाही, कष्ट होत नाहीत. परंतु प्रत्येकाचा अनुभव पाहावा तर प्रेम करणे तितकेसे सोपे आहे असे दिसत नाही. याचे कारण प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा, आवड निराळी, आणि दैवयोगाने आलेले ऋणानुबंध निरनिराळे असतात. आपल्या विचाराचे लोक असतील त्यांच्यावर स्वाभाविकच प्रेमच जडते; विरूद्ध असतील त्यांच्याबद्दल प्रेम वाटत नाही, किंबहुना द्वेषही उत्पन्न होतो. द्वेष उत्पन्न का होतो तर आपला आणि दुसऱ्याचा विचार आणि आवड जमत नाही म्हणून. परंतु थोडा विचार केला तर असे दिसते की, आपण ज्या कारणामुळे दुसऱ्याचा द्वेष करतो, तेच कारण दुसऱ्याने आपला द्वेष करायला पुरेसे होते. उदाहरणार्थ, एखादी गोष्ट आपल्याला न आवडली आणि तीच दुसऱ्याला आवडली, तर मला न आवडलेली गोष्ट दुसऱ्याला आवडल्यामुळे दुसऱ्याचा द्वेष



करायला मला तेवढे कारण पुरेसे होते. मग त्याच न्यायाने, त्याला न आवडलेली गोष्ट मला आवडते हेच कारण त्याने माझा द्वेष करायला पुरेसे नाही का ? 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्याचा अर्थच असा की, स्वभावाप्रमाणे प्रत्येकाची आवड ही निराळी असणारच. म्हणून द्वेषबुद्धी नाहीशी करण्याकरिता प्रत्येकाच्या स्वभावाला थोडी सवलत ठेवणे जरूर आहे; आणि प्रेम जडण्याकरिता, सर्वांना आवडणारी जी गोष्ट असेल तिकडे लक्ष देणे जरूर आहे. प्रेम करण्याचा धडा गिरवताना सुरूवात आपल्या घरापासून करावी; घरातली माणसे, नंतर शेजारी, आणि त्यानंतर आजूबाजूला, आपलेपणाची भावना आपल्या कृतीने वाढवावी; म्हणजे क्रमाक्रमाने प्रेमाची वाढ होऊन सर्व वातावरण प्रेममय होऊन जाईल. सर्वांशी निष्कपट प्रेमाने वागावे; आपल्या बोलण्यामध्ये, नव्हे, पाहण्यामध्येसुद्धा प्रेम असावे. आपले बोलणे अगदी गोड असावे. आपल्या अंगी सहजता यावी. घरामध्ये 'अमुक एक गोष्ट कराच' किंवा 'नकाच करू' असे हट्टाने न म्हणता आपण राहावे. जसे घडेल तसे घडू द्यावे. देह असा प्रारब्धावर टाकणे मला फार आवडते.

प्रेम करायला गरिबी आड येत नाही, किंवा श्रीमंती असेल तर फार द्यावे लागत नाही. जसे आई आणि मुलाचे प्रेम असते तसे भगवंताचे प्रेम लागावे. ज्याला भगवंताचे प्रेम येईल, तो सृष्टीकडे कौतुकाने पाहील. भगवंताचे प्रेम हे कोणत्याही साधनाचा प्राण आहे; ते मागण्यासाठी रोज भगवंताची प्रार्थना करावी, आणि त्याच्या अनुसंधानात राहण्याचा प्रयत्न ठेवावा.

## जालिंदरनाथ



श्री चैतन्य जालिंदरनाथांचा जन्म सोमयज्ञा मधून झाला आहे हस्तिनापुराचा राजा ब्रिहद्रव सोमयज्ञ करीत असताना त्या त्या यज्ञ मध्ये ऋषी मुनींनी विभूती घेण्यासाठी हाथ टाकला तर त्यात त्यांना एक मुलाचे पाय लागले व त्यांनी त्या मुलाला बाहे काढले अश्या प्रकारे चैतन्य जालिंदर नाथांचा जन्म झाला. त्याच्या जन्माची कथा अशी आहे की आदिनाथ शिव शंकराचं तिसऱ्या नेत्रात अग्नी त्या यज्ञ कुंडा मध्ये सामावला आणि त्या मध्ये अंतरिक्ष नारायणा ने प्रवेश केला त्यातून जालिंदर नाथ प्रकट झाले अग्नितून प्रकट झाले म्हणून त्यांना अग्नी देवाचे पुत्र असे म्हणतात.


किशोर कुमार यांची अफलातून कल्पना आणि हास्यकल्लोळ
पान ६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २७ ऑक्टोबर २०२३


ते कोण लोक आहेत
पान ७





# ध्येय ठरवून ध्येयसिद्धीसाठी स्वकर्तृत्वाने सिद्ध व्हा !

## प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे : स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) स्मृती व्याख्यानमालेला उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** विद्यार्थ्यांनी दिसण्यापेक्षा असण्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. विद्या ही विनम्रतेने शोभत असते. त्यामुळे आपण रावणाला नाही तर श्रीरामाला पूजत असतो. कारण प्रभू श्रीराम सर्वगुणसंपन्न होते. रावण हा देखील ज्ञानी व पराक्रमी होता. परंतु विनम्र नव्हता. त्यामुळे त्याच्या ज्ञानाला किंमत आली नाही. यासाठी आपण अभ्यास करत असताना ज्ञान मिळवा. ज्ञानाने मोठे व्हा. ज्ञान मिळवल्यानंतर उर्मटपणा व उद्धटपणा अंगी आणू देऊ नका. पाठांतर करण्यापेक्षा समजून घेण्यावर भर द्या, असा सल्ला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी येथे केले.

जळगाव येथील ए. टी. झांबरे माध्यमिक विद्यालयात आयोजित मासिक व्याख्यानमालेत डॉ. लेकुरवाळे यांनी विद्यार्थी म्हणून वावरताना या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दर महिन्याला एका जिल्ह्यात मासिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात येते. जळगाव येथील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका प्रणिता झांबरे तर प्रमुख पाहुणे म्हणून भुसावळ येथील श्री संत गाडगे महाराज हिंदी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद आठवले तसेच बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य व महाराष्ट्र शासनाच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यशिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित डॉ. जगदीश पाटील यांच्यासह व्याख्यानमालेचे संयोजक व दैनिक आधुनिक केसरीचे संपादक डॉ. प्रभू गोरे, सहाय्यक संजय व्यापारी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

प्रारंभी उद्घाटक डॉ. जगदीश पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. स्व. डॉ. जी. डी. बेंडाळे व दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी उर्फ काकाजी यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. मान्यवरांचे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकात व्याख्यानमालेचे संयोजक डॉ. प्रभू गोरे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी लागून त्यांना यशाचा मार्ग सुलभ व्हावा यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात मासिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात येते. या निमित्ताने विचारवंत व्यक्तींचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतात आणि ज्ञान व संस्कार यांचे आदानप्रदान होत असल्याने त्यासाठी सुद्धा असे कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरत असतात. हा विचार मनाशी बाळगून ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली असून या व्याख्यानमालेचे हे पंधरावे पुष्प असल्याचेही त्यांनी सांगितले. विद्यार्थी म्हणून वावरताना या विषयावर बोलताना प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे म्हणाले की, प्रत्येक अभ्यासक हा विचार करून बोलत असतो. म्हणून पुस्तके वाचण्यावर भर द्या. सोशल मीडियाच्या वाईट बाबींकडे दुर्लक्ष करा. तुम्हाला फसविण्यासाठी अनेक लोक टिपलेले आहेत. त्यांच्या बळी पडू नका. आपला मार्ग ठरवून त्या मार्गाच्या प्राप्तीसाठी सातत्याने प्रयत्न करा. आपले ध्येय ठरवून त्या ध्येयाच्या सिद्धीसाठी स्वकर्तृत्वाने सिद्ध व्हा. तेव्हाच आपण आपल्या आई-वडिलांच्या अपेक्षा पूर्ण करणार आहोत. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने शालेय जीवनापासून केलेला अभ्यास हाच त्याच्या स्पर्धा परीक्षांचा पूर्वतयारीचा भाग असल्याचेही लक्षात घ्यावे. आताच जर तुम्ही मनापासून अभ्यास केला तरच तर तुम्हाला स्पर्धा परीक्षा अजिबात कठीण जाणार नाहीत. त्यामुळे समजून घेण्यावर भर देण्याची गरज आहे, असेही प्रतिपादन डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी आपल्या व्याख्यानात केले.

अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापिका प्रणिता झांबरे यांनी व्याख्यानमालेची आज गरज असल्याचे सांगून वाचनाकडे विद्यार्थ्यांनी प्राधान्याने लक्ष द्यावे असे आवाहन केले. त्यानंतर शाळेतर्फे मान्यवरांना पुस्तक भेट देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना वाचनासाठी मान्यवरांच्या हस्ते अवांतर वाचनाची पुस्तके वाटप करण्यात आली. या पुस्तकांचे महिनाभरात वाचन करून त्यासंदर्भातील सारांश लेखन लिहून आणावे अशाही सूचना देण्यात आल्या. सूत्रसंचालन प्रतिभा लोहार यांनी तर आभार डॉ. जगदीश पाटील यांनी मानले. व्याख्यानमालेचा लाभ आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी घेतला. यावेळी वर्षा चौधरी, भक्ती बर्वे, जया राणे आदी शिक्षकांची उपस्थिती होती.

**अपयश पचवता आले पाहिजे :** भुसावळ येथील श्री संत गाडगे महाराज व हिंदी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद आठवले म्हणाले की, प्रत्येक मनुष्याच्या जीवनात भाषेला खूप महत्त्व असते. भाषेमुळे मनुष्याने प्रगती केली असून मानवी प्रगतीचा भाषा हा एक प्रमुख आधार आहे. आपण यशाच्या मागे धावत असताना त्यातील एक विजयी होतो. बाकीचे मात्र पराजयी होतात. अशा वेळी आपण अपयशाचे मानसशास्त्र समजून घेऊन ज्यांना अपयश मिळाले आहे त्यांच्या प्रयत्नांना आपण सलाम केला पाहिजे. अपयश पचवता आले पाहिजे. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांवर आपण विश्वास ठेवला पाहिजे. शिकणे वाया जात नाही. म्हणून अपयशानंतर यश मिळवण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केले पाहिजे. भाषेला समजून घेतले पाहिजे. भाषा ही जशी वाकवली तशी वाकत जाते. त्यामुळे भाषेचा आधार घेऊन आपण आपल्या अभ्यासाकडे पाहिले पाहिजे. त्यामुळे अभ्यास सोपा होऊन आपल्याला पुढील मार्ग सोपा होत जातो, असे सांगून प्रमोद आठवले यांनी भाषेच्या गमतीजमती विविध उदाहरणांमधून सांगितल्या.



# न्या. शिंदे समितीला दस्तावेज उपलब्ध करून द्यावे

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** मराठा - कुणबी, कुणबी -मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहित करण्यासाठी न्या.संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष न्या.श्री.शिंदे (निवृत्त) आणि समिती सदस्य समितीच्या कामकाजासाठी 27 ऑक्टोबर रोजी धाराशिव येथील सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात येत आहे. नागरिकांनी उपलब्ध निजामकालीन पुरावे, वंशावळी, शैक्षणिक पुरावे, महसुली पुरावे, निजामकाळात झालेले करार, निजामकालीन संस्थानिकांनी दिलेल्या सनदी व राष्ट्रीय दस्तावेज आदी समितीस जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपलब्ध करून द्यावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# बचत गटाच्या प्रमुखांना मोबाईल देणार : सामंत

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग :** जिल्ह्यातील महिला बचत गटाचे काम सांभाळणाऱ्या सर्व महिलांना जिल्हा नियोजन विकास निधीतून मोबाईल फोन दिले जातील. पुढील दोन महिन्यांत या मोबाईल फोनचे वितरण केले जाईल, अशी घोषणा राज्याचे उद्योगमंत्री आणि रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी केली. यावेळी रायगडचे पालकमंत्री उदय सामंत राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, जिल्हाधिकारी योगेश म्हसे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे उपस्थित होते.


प्रथम वाढदिवस

२७ ऑक्टो.
नेत्रा
अक्षय वेताळ
प्रथम
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
कोकीळा लक्ष्मण कावले
( आजी आजोबा)
संजय लक्ष्मण वेताळ
( आजी आजोबा)
शितल अक्षय वेताळ
( आई वडील)
स्वाती प्रकाश शेळके
( आत्या मामा)
स्वाती महादू आगले
( मावशी काका)


# उच्च न्यायालयाचा अवमान करणे बाजार समितीला भोवले

## फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश : पुढील कारवाईकडे लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील खडसे**

**रिसोड :** गाळे वाटप प्रकरणात उच्च न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल मुख्य प्रशासक, तत्कालीन सचिव तसेच दुय्यम निबंधक रिसोड यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून बेकायदेशीररित्या केलेले करारणाने रद्द करण्यात यावे. अशा आशयाचे पत्र जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वाशिम यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रिसोड यांना दिले आहे. या प्रकरणामुळे रिसोड बाजार समितीत झालेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार उघड होणार असल्याने बाजार समितीच्या वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. परिणामी पुढील कारवाईकडे सर्वसामान्यांचे लक्ष वेधले आहे.

उच्च न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल मुख्य प्रशासक व तत्कालीन सचिव तसेच दुय्यम निबंधक रिसोड यांचेवर तत्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून बेकायदेशीर रित्या केलेले करारनामे रद्द करण्यात यावे अश्या आशयाचे पत्र जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वाशिम यांनी सहायक निबंधक सहकारी संस्था रिसोड यांना दिले आहे यामुळे मात्र रिसोड बाजार समितीच्या वर्तुळामध्ये एकच खळबळ उडाली असून यामुळे लाखोचा भ्रष्टाचार उघड होणार असून सहायक निबंध यांच्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जानेवारी 2021 मध्ये येथील बाजार समितीच्या संचालकांचा कार्यकाळ संपल्यानंतर त्या ठिकाणी मुख्य प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. येथील बाजार समितीवर अधिक काळ प्रशासक म्हणून एम .बी.बनसोडे हे राहिले आहेत. राज्यातील सर्व मुदत संपलेल्या बाजार समित्यांना कोणतेही धोरणात्मक निर्णय न घेण्याचा निर्णय नागपूर खंडपीठाने डिसेंबर 2022 मध्ये दिला होता. तत्कालीन प्रशासकाने हा नियम डावलून गाळे गोदामे यांचे करारनामे केले आहेत. तसेच बाजार समितीमध्ये खरेदी केलेल्या वस्तू नोंदविण्याकरता स्टॉकबूकच ठेवले नसल्यामुळे




आणलेल्या वस्तूची कुठेही नोंद नाही. अविक्रय माल, दुरुस्ती, अविक्रीय माल खरेदी, इतर खर्च, वैद्यकीय आकस्मिक खर्च, आग्रीम, छपाई खर्च, भेटी समारंभ खर्च, इत्यादी मध्ये अनियमितता दिसून येत आहे. प्रशासक मंडळांना मानधन घेता येत नसताना सुद्धा मासिक मानधन घेतलेले आहे. त्याचप्रमाणे दर महिन्याला चहापाणी खर्च लाखो रुपये दाखविण्यात आला आहे. बाजार समितीच्या परिसरामध्ये कुठेही गिट्टी, चुरी टाकण्यात आलेली नसताना तसेच महसुलाची कोणतीही चलान भरलेली नसताना बिले काढली असल्याचे मासिक खर्चाच्या विवरण पत्रावरून दिसत आहे. यासंदर्भात माजी उपसभापती विठ्ठलराव आरु व संचालक रामेश्वर नरवाडे यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. गाळे, गोदामे भूखंड ,यामध्ये भ्रष्टाचार करून बाजार समितीचे लाखो रुपयाचे नुकसान केल्याचा आरोप त्यांनी केला आहे .तत्कालीन प्रशासकाने उच्च न्यायालयाने डिसेंबर 2022 रोजी दिलेल्या आदेशाचा अवमान केला आहे .त्यांच्यावर तत्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावे व सर्व नियम डावलून जे करारनामे करून दिले आहेत ते सर्व करारनामे रद्द करून बाजार समितीच्या ताब्यात देऊन त्याचे रीतसर वाटप करण्यात यावे अशी तक्रार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वाशिम यांना प्राप्त झाली आहे. त्या तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन प्रशासक यांचे वर तत्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून बेकायदेशीररित्या केलेले करारनामे रद्द करण्यात यावे अश्या आशयाचे पत्र जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वाशिम यांनी सहायक निबंधक सहकारी संस्था रिसोड यांना दिले आहे. सहायक निबंधक काय कारवाई करतात यांच्याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## 'इंडिया' ऐवजी 'भारत'

आधुनिक केसरी

पाठ्यपुस्तकांमध्ये 'इंडिया'ऐवजी 'भारत' अशा उल्लेखासह आणखीही बदल सुचवण्यात आले आहेत. यात अभ्यासक्रमात 'प्राचीन इतिहासा'ऐवजी 'अभिजात इतिहास' आणि भारतीय ज्ञान प्रणालीचा (इंडियन नॉलेज सिस्टीम) समावेश करण्याचा सल्लाही देण्यात आला आहे, असे समितीचे अध्यक्ष सी. आय. इसाक यांनी सांगितले. मात्र, याबाबत कोणताही निर्णय झालेला नसल्याची माहिती 'एनसीईआरटी'चे अध्यक्ष दिनेश सकलानी यांनी दिली. 'सर्व वर्गांतील विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये देशाच्या नावाचा उल्लेख भारत असा करावा, अशी शिफारस समितीने एकमताने केली आहे. त्याचबरोबर पाठ्यपुस्तकांमध्ये 'प्राचीन'ऐवजी अभिजात इतिहासाचा समावेश असावा, अशी शिफारसही केली आहे,' असे इसाक यांनी सांगितले. 'भारत हे देशाचे प्राचीन नाव असून, सात हजारांहून अधिक जुन्या विष्णू पुराणामध्येही त्याचा उल्लेख आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. जागतिक पातळीवर 'जी-२०' परिषदेमध्ये पहिल्यांदा 'इंडिया'ऐवजी 'भारत' असा अधिकृत उल्लेख करण्यात आला होता. त्यानंतर पंतप्रधानांच्या नावापुढेही देशाचे नाव भारत असे नमूद करण्यात आले होते. विविध लढायांमधील 'हिंदूंनी गाजवलेले शौर्य, पराक्रम आणि विजयाच्या गाथाही अधोरेखित करण्याची सूचना करण्यात आली आहे. सध्याच्या अभ्यासक्रमांमध्ये आपल्या अपयशाचाच अधिकाधिक उल्लेख दिसतो. मात्र, मुघल आणि सुलतानांवर आपण मिळवलेला विजय फारसा अधोरेखित होत नाही, असे इसाक म्हणाले. ते स्वत: भारतीय ऐतिहासिक संशोधन परिषदेचे सदस्य आहेत. 'ब्रिटिशांनी भारतीय इतिहासाची तीन टप्प्यांत विभागणी केली. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक असे टप्पे तयार करण्यात आले. यात भारताचा इतिहास हा अंध:कारमय दाखवण्यात आला. वैज्ञानिक ज्ञान आणि प्रगतीबद्दल अनभिज्ञता दर्शवण्यात आली आहे. त्यामुळेच भारतीय विद्यार्थ्यांनी मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडाबरोबर इतिहासाच्या अभिजात कालखंडाचेही धडे गिरवावेत, असे आम्हाला वाटते, असे ते म्हणाले. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये 'एनसीईआरटी'कडून अभ्यासक्रमात सुधारणा करण्यात येत आहे.

## लोकशाही म्हणजे कुणाची सत्ता ?

आधुनिक केसरी

**भारतावर इंग्रजांची सत्ता होती.त्यांची हुकुमशाही होती.ही हुकुमशाही भारतीय भांडवलदारांना अडचणीची झाली. कारण या देशाचा कचामाल इंग्रज इंग्लंडला पाठऊ लागले.उदा.कापूस आणि त्यांच्या देशातील कारखान्यांना म्हणजे तेथील भांडवलदारांना देऊ लागले. तेथे कापड तयार होऊन परत येथेच आणून विकू लागले आणि यातून इंग्लंडचे कारखानदार भरपूर नफा कमाऊन मालामाल झाले. या सरकारी धोरणामुळे येथील कारखाने बंद पडू लागले. म्हणून येथील कारखानदार उदा. मोरारजी देसाई; टाटा बिर्ला मफतलाल बजाज यांच्या कारखान्याला लागणारा कचामल इंग्लंडच्या कारखान्याला जायला लागला. या नाराजीतून म्हणजे देसी भांवडवलदार आणि परदेशी भांडवलदार यांच्या नफा कमावण्याच्या महत्त्वाकांक्षा तून भारतीय स्वातंत्र्याचा लढा सुरू झाला. भांडवलशाही त पण भांडवलदारांचे भांडण चालते.नफा कमावण्याची स्पर्धा म्हणजे चढाओढ असते.**

त्यातून देशांतर्गत किंवा देशादेशातील भांडवलदार आपापसात झगडा लढाया करतात.यातूनच जागतिक महायुद्धे पण घडतात.अशी दोन महायुद्धे झाली. तिसरे महायुद्ध होण्याची शक्यता आहे. असो.ही या लेखाची प्रस्तावना झाली. आता मूळ विषयाकडे येतो. ही पार्श्वभूमी सांगण्याचा उद्देश की भारतीय स्वातंत्र्याची सुरुवात किंवा उगम कसा झाला ? आणि का झाला ? हे सांगणे जरुरीचे आहे. या देशातील भांडवलदारांना आपले नुकसान करणारे सरकार नको होते. ही एक आर्थिक पार्श्वभूमी स्वातंत्र्य लढ्याची आणि अजून एक कारण आहे. ते म्हणजे भारतातील वर्ण व जाती वादी सनातनी प्रतिगामी स्थितीवादी मूठभर लोकांना हे पुरोगामी प्रगतिशील इंग्रज सरकार नको होते.कारण सतीची चाल बंद करणे, बहुजनांना शिक्षण देणे, अस्पृश्यता बंद करणे, जातीचे धर्माचे न्यायालये बंद करणे, लोकांच्या मागण्या नुसार कायदे व योजना बनविणे ; सांस्कृतिक स्वातंत्र्य देणे. उदा. कुणी काय खावे ; कुणी कोणता पोशाख घालून फिरावे; कुणी कोणती केशभूषा करावी, कोणत्या रूढी परंपरा सण करावेत, कुणी कोणत्या देवळात जावे, याचे स्वातंत्र्य तसेच विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य ते देत होते.जाती व्यवस्था त्यांना मान्य नव्हती.म्हणून सामाजिक न्यायाची लढाई लढणाऱ्या फुलेंना व बाबासाहेबाना ते मदत करीत.अश्या कामाला पुरस्कार पण देत. नेमके हेच येथील अंध श्रद्धा रूढी परंपरा वादी सनातनी लोकांना हे इंग्रज जाचक वाटू लागले कारण इंग्रज भारतीय भांडवलशाही आणि भारतीय सामाजिक विषमता यांचे विरुध्द होते. मात्र हिंदु मुस्लिम धर्माचे विरुध्द नव्हते. येथील म्हणजे भारतीय भांडवल दार आणि जातीवादी जमीनदार एक झाले आणि त्यांनी इंग्रज हुकुमशाही विरुध्द युद्ध पुकारले. परंतु त्यांच्या बलाढ्य शक्ती पुढे आपण टिकणार नाही.यासाठी भारतीय बहुजन समाजास उठविले पाहिजे हे त्यांच्या लक्षात आले. बहुजनांच्या सहभागाशिवाय कुठलीही क्रांती अशक्य आहे.हे त्यांना पक्के माहीत होते. पण बहुजन या लढ्यात भाग का घेतील ? यातून त्यांना काहीच लाभ मिळणार नाही उलट हकनाक जीव गमवावे लागतील; म्हणून ते या भटजी आणि शेठजी चे लढाईत भाग घेण्यासाठी एक नामी युक्ती शोधून काढली ( जशी बिजेपिने श्रीराम देव व धार्मिक भावना ) ती म्हणजे देशभक्ती ची भावनेची ज्योत पेटवून त्या ज्योतीचे मशालीत रूपांतर करणे आणि ह्या त्यांच्या युक्तीला यश मिळाले. जसे आरएसएस ला मिळाले तसे आणि भारतीय लहानथोर म्हातारे कोता रे पेटून उठले.टिळकांचा मंत्र घोटला." स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि जीव गेला तरी चालेल पण तो मिळविल्या शिवाय गप्प बसणार नाही. अन् बहुजनांनी सर्व जाती धर्मियांनी एकजूट करून ते मिळविलेच. पण त्यांना माहित नव्हते की हे स्वातंत्र्य आपल्या नव्हे तर येथील धर्मांध जातीवादी भांडवलदार जमीनदारांच्या हातीच राहणार आहे. गोरे इंग्रज जाऊन काळे देशी काळे इंग्रज सत्तेवर बसणार आहेत. सत्ता आपले हाती येणार नाही. कारण काँग्रेस संघटनेचे पुढारी हे शेटजी भटजी च होते. बहुजन कुणी त्यात नव्हते.तरीही पण त्यातील काही समाजवादी व लोकशाहीवादी विचाराचे होते त्यांचे वर्चस्व त्या संघटनेत ( काँग्रेस ) होते.म्हणून भांडवली च का होईना पण लोकशाही भारतात अवतरली. स्वतंत्र भारताच्या लोकशाहीत बहुजनांचा सात्तेत वाटा मिळावा म्हणून बाबासाहेबांनी सामाजिक न्यायाची काही कलमे संविधानात समाविष्ट करून बहुजनांना काही प्रमाणात शैक्षणिक आर्थिक सामाजिक राजकीय न्याय मिळवून दिला. हुकूमशाही या देशात परत येता कामा नये. सत्ताधारी निरंकुश सत्ता गाजाऊ नये.मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान हुकूमशहा बनू नये म्हणून संविधानात सत्तेचे विकेंद्रीकरण केले. जसे की कायदेमंडळ कार्यकारी मंडळ ( मंत्रिमंडळ ) न्यायमंडळ स्थापन केले व प्रत्येकाचे हक्क अधिकार स्वतंत्र दिले.याचा अर्थ या तीन मंडळ पैकी कुण्या एकाच्या हाती सत्ता दिली नाही. कारण मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय म्हणजे जी.आर ला लोकसभा आणि केंद्रात आणि विधानसभा राज्यात यांची मान्यता घ्यावी लागते. कायदेमंडळ म्हणजे विधानसभा लोकसभा यांनी लोकहिताचे कायदे करावेत. त्या कायद्याची अमलबजावणीसाठी कार्यकारी मंडळ आणि या दोन्हींचे काम किंवा निर्णय पाऊले



चुकीचे पडत असतील तर सर्व सामान्य रस्त्यावरच्या माणसाला म्हणजे नागरिकास त्या मंडळांचे विरुध्द न्यायालयात दाद मागता येते.आणि न्यायालयाने संविधानाच्या आधारेच न्याय दिला पाहिजे.अशी ही संविधानातील सत्तेच्या विकेंद्रीकरण ची रचना आहे.असे असताना पण आजची राजकीय परिस्थिती काय आहे ? मोदी पंतप्रधान लोकसभेतील बहुमताच्या आधारे हुकुमशाही पद्धतीने का वागत आहेत ? ( अशी आरएसएस मध्ये पण चर्चा आहे . ) यावर विचारवंत कायदेतज्ञ कार्यकर्ते देशभक्तांनी चिंतन करण्याची ही वेळ आहे.अन्यथा हुकुमशाही परत येणार.लोकशाही लोप पावणार. जनता गुलाम होणार.हे निश्चित आहे. वर्तमानातील राजकीय परिस्थिती पाहून असा विचार येतो की ; लोकशाही म्हणजे लोकसत्ता की प्रतिनिधींची सत्ता ? की लोकप्रतिनिधींच्या नेत्याची सत्ता ? आज मितिष लोकप्रतिनिधींचा नेता म्हणजे पंतप्रधान या देशातील साऱ्या स्वायत्त संस्था खिश्यात ठेवतो.त्यांचे हक्क अधिकार स्वातंत्र्य यांची पायमल्ली करतो. उदा.भारतीय रिझर्व बँक, निवडणूक आयोग, ईडी यंत्रणा ; गुप्तचर यंत्रणा, प्रसारमाध्यमे, न्यायालय, मिलिटरी ? इत्यादी अजून काही महत्त्वाच्या यंत्रणा.विविध खात्यांच्या मंत्र्यांना न विचारताच ट्यांचेशी चर्चा न करता तसेच लोकसभेतील त्यांच्याच पक्षाच्या का होईना खासदार यांचे पुढे चर्चेसाठी ठराव न ठेवता एकटेच सारे निर्णय घेतात.आणि सर्व मंत्र्यांना डावलून आपलीच प्रसिध्दी करून घेतात. हा एकहाती कारभार आणि एकटाच निर्णय घेणे म्हणजेच हुकुमशाही होय. विरोधी पक्ष संपवण्याचा प्रयत्न करणे हे संविधान विरोधी कृत्य आहे.कारण सरकार एव्हढेच महत्त्व विरोधी पक्षांना आहे. कारण त्यांना पण जनतेने निवडून दिले आहे आणि सरकार जर बेछूट वागत असेल तर त्याला रोकण्यासाठी त्याची वेशन विरोधीपक्ष आणि प्रसारमाध्यमे आणि लोकसंघटनाचे हाती दिली आहे. पण सत्येचा गैरवापर करून सगळ्यांना ईडीची भीती दाखवून खोट्या केसेस ची भीती दाखून सगळीकडे भीतीचे वातावरण निर्माण केले आहे.यालाच हुकुमशाही म्हणतात. अघोषित आणीबाणी म्हणजेच हुकुमशाही होय. ही आणि अशी वेळ का आली ? याचे कारण लोकशाहीची आपली व्याख्या स्पष्ट नाही. लोकशाही म्हणजे लोकांचीच सत्ता हवी. लोकप्रतिनिधी किंवा त्यांचे नेत्यांची नाही. लोक फक्त मतदान देण्यासाठी नाहीत तर पंतप्रधान किंवा खासदाराला सुद्धा परत बोलाऊ शकतात. त्याची जर वर्तणूक बरोबर नसेल; आधी चांगला होता आणि सत्ता आली हता आणि लोकांना दिल्या लाथा, असे त्याचे वर्तन होत असेल तर पाच वर्षाची वाट न बघता केंव्हाही त्यास परत बोलावण्याचा अधिकार संविधानाने मतदारास दिला पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने इथे लोकसत्ता येईल. नाहीतर मुख्यमंत्री पंतप्रधान लोकप्रतिनिधी यांचीच सत्ता राहील आत्ता जसी आहे तशी. जनता फक्त व्होट देण्याचे एक यंत्र म्हणूनच असेल.

दत्ता तुमवाड,
9420912209

## भटक्या कुत्र्यांची दहशत



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**बाघ बकरी चहा कंपनीचे संचालक पराग देसाई यांचा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. पराग देसाई यांचा असा वेदनादायी अंत खरोखरीच दुर्दैवी आहे. पराग देसाई यांच्या मृत्यूनंतर भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पराग देसाई यांच्यावर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्यावर स्वतःचा बचाव करताना पराग देसाई अडखळून पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला त्यातच त्यांचा दुर्दैवी अंत झाला. पराग देसाई यांचा मृत्यूने संपूर्ण राज्य हळहळले. पराग देसाई हे प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे त्यांच्या मृत्यूची बातमी झाली न्युज चॅनलवर त्याची ब्रेकिंग न्युज झळकली. मात्र भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेले पराग देसाई हे देशातील पहिले व्यक्ती नसून याआधीही अशा अनेक घटना घडल्या आहेत.**

आपल्या देशात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दररोज सहा हजारांहून अधिक लोक जखमी होतात अशी सरकारी आकडेवारी आहे. दररोज सहा हजारांहून अधिक लोक जर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होत असेल तर ती मोठी गंभीर बाब आहे. केवळ शहरातच नाही देशातील गावागावात भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत आहे. गाव असो वा शहर, चाळ असो वा सोसायटी, पायवाट असो वा महामार्ग, चौक असो वा नाका सर्वत्र तुम्हाला भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी उभ्या असलेल्या दिसतील. हे भटके कुत्रे रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकांवर अचानक हल्ला करतात. विशेषतः शाळकरी मुले , वृध्द, अपंग व महिलांना भटके कुत्रे टार्गेट करतात. दबा धरून बसलेले भटके कुत्रे अचानक घेराव घालून हल्ला करतात. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात लोक अक्षरशः रक्तबंबाळ होतात. भटक्या कुत्र्यांच्या चावण्याने रेबीज नावाचा रोग होतो या रोगावर जर वेळीच उपचार केला नाही तर रोगी दगावण्याची देखील शक्यता असते मात्र अनेक सरकारी रुग्णालयात रेबीज वरील लसच उपलब्ध नसते. ग्रामीण भागात तर हे नेहमीचेच चित्र आहे. भटक्या कुत्र्यांची दहशत केवळ रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकानांच आहे असे नाही तर पाळीव प्राण्यांना देखील आहे. शेळी, मेंढी, कोंबड्या यासारख्या पाळीव प्राण्यांवर देखील भटकी कुत्री हल्ले करतात. भटक्या कुत्र्यांच्या झुंडी अचानक येऊन पाळीव प्राण्यांचा फडशा पाडतात. भटक्या कुत्र्यांचा त्रास वाहन चालकांना देखील होतो विशेषतः दुचाकी स्वारांना भटके कुत्र्यांची मोठी दहशत आहे. रस्त्यांवर दुचाकी दिसली की भटके कुत्रे वाहनांच्या मागे धावतात, वाहनांना आडवे येतात त्यामुळे बऱ्याचदा अपघात होतो आणि त्या अपघातात वाहन चालक जखमी होतात त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांकडून होत असते मात्र त्यावर प्रशासन गंभीर नसते. खूपच मागणी झाली किंवा प्रसार माध्यमातून आवाज उठवला तर दिखाव्यासाठी कारवाई केली जाते. भटक्या कुत्र्यांचे निर्बिजिकरण नियमित केले जाते असे प्रशासनामार्फत सांगितले जाते मात्र वस्तुस्थिती वेगळीच आहे. जर भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण नियमित केले जाते तर मग देशातील भटक्या कुत्र्यांची संख्या का वाढत आहे असा प्रश्न आहे. एकट्या मुंबई शहराचे उदाहरण घेऊ. २०१४ साली मुंबईत ९५ हजार



भटकी कुत्री होती आज त्यांची संख्या १ लाख ६४ हजार इतकी आहे याचाच अर्थ मागील, नऊ वर्षात मुंबईतील भटक्या कुत्र्यांची संख्या ७२ टक्क्यांनी वाढली. जर भटक्या कुत्र्यांची संख्या अशीच वाढत राहिली आणि त्यांचे नागरिकांवर होणारे हल्ले देखील वाढत राहिले तर भविष्यात मानव विरुद्ध भटकी कुत्री असा संघर्ष निर्माण होऊ शकतो तो होऊ द्यायचा नसेल तर शासन, प्रशासनाने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी ठोस उपाय योजायला हवेत. केवळ निर्बिजीकरण केल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होणार नाही हे सिद्ध झाले आहे. प्राणीमित्र संघटनांनीही या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहायला हवे. भटक्या कुत्र्यांना सहानुभूती दाखवताना त्यांच्या हल्ल्यात जखमी होणाऱ्या नागरिकांकडे देखील सहानुभूतीने पाहायला हवे. आपल्या देशात २००१ साली प्राणी कल्याण कायदा लागू झाला या कायद्यानुसार भटक्या कुत्र्यांना संरक्षण मिळाले. भटक्या कुत्र्यांना ते आहेत त्या ठिकाणापासून कोणीही हलवू शकत नाही शिवाय त्यांना त्याच ठिकाणी खायला घालणे अनिवार्य करण्यात आले. या कायद्यामुळे भटक्या कुत्र्यांना तर संरक्षण मिळाले पण नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव वाढला. भविष्यात हा उपद्रव आणखी वाढणार आहे. म्हणूनच या कायद्याचा मान राखून नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव कसा रोखता येईल यासाठी कोणता मध्यममार्ग काढता येईल यासाठी सरकारने एक समिती नेमावी. प्राणीमित्र संघटनेच्या सदस्यांसह, तज्ज्ञांचा समावेश या समितीत करावा. या समितीने योग्य मार्ग काढून भटक्या कुत्र्यांना संरक्षण देऊन त्यांच्यापासून नागरिकांना होणारा उपद्रव थांबवावा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पीएम स्वनिधी योजनेत वृत्तपत्र विक्रेत्यांचा समावेश : डॉ. कराड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील वृत्तपत्र विक्रेत्यांना केंद्र शासनाच्या पीएम स्वनिधी योजनेचा लाभ देण्यासाठी त्यांची नोंदणी करून घेण्याचे निर्देश केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिले आहेत. या योजनेचा शहरातील सुमारे ६०० वृत्तपत्र विक्रेत्यांना होणार आहे. श्रमिक वर्तमानपत्र विक्रेते संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी (ता. २३) डॉ. भागवत कराड यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी डॉ. कराड यांनी शहरातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांचा पीएम स्वनिधी योजनेचा लाभ देण्यासाठी त्यांची नोंदणी करून घेण्याचे निर्देश महापालिका अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे सांगितले. त्यानुसार वृत्तपत्र विक्रेत्यांना पहिल्या टप्प्यात १० हजार रुपये कर्ज मिळेल. त्यानंतर परतफेड वेळेवर केल्यास कर्जाची रक्कम वाढत जाईल. तसेच रेशनकार्ड काढून देण्यासह विविध आठ योजनांचा लाभ वृत्तपत्र विक्रेत्यांना मिळेल, असे डॉ. कराड यांनी स्पष्ट केले. यावेळी संस्थापक अध्यक्ष प्रकाश वाघ, अध्यक्ष विष्णू कावळे, सचिव शिवाजी ढेपले, कोषाध्यक्ष राजू गायकवाड यांची उपस्थिती होती. वृत्तपत्र विक्रेत्यांना बसण्यासाठी महापालिकेच्या खुल्या जागेत हॉल व शेड करून द्यावे, सर्वांना पिवळे रेशनकार्ड देण्यात यावे, वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मुला-मुलींना फिसमध्ये सवलत मिळावी किंवा मोफत शिक्षण देण्यात यावे, विक्रेते व महिलांसाठी विनातारण, कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून द्यावे, रेल्वे व बस प्रवासात सवलत देण्यात यावी, पेन्शन देण्यात यावे व पत्रकारितेचा दर्जा देण्यात यावा, घरकूल योजनेत समावून घेण्यात यावे, दुपारी रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी, विक्रेत्यांना व्यवसायासाठी महापालिकेतर्फे जागा उपलब्ध करून द्यावी आदी मागण्यांचे निवेदन डॉ. भागवत कराड यांना देण्यात आले.





# घातक टर्मिन ड्रग इंजेक्शनची सर्रास विक्री थांबवावी : युवासेना

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात सर्रासपणे टर्मिन नामे ड्रग इंजेक्शनची विक्री सुरू आहे, या इंजेक्शनची गरज फक्त ऑपरेशन करतेवेळी असते, तरीही सर्वसाधारण मेडीकल स्टोअर्सवर सदर इंजेक्शन मिळत असून अनेक मेडीकल स्टोअर्सला डॉक्टर्सच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय वाढीव दराने इंजेक्शन विक्री सर्रासपणे सुरू आहे, यामुळे हृदय विकाराचा झटका येणे, नैराश्य येणे, गुन्हेगारी प्रवृत्ती वाढणे असे अनेक दुष्परिणाम युवकांमध्ये दिसून येत आहेत.

या इंजेक्शनचा वापर कुस्तीगीर, खेळाडू व अनेक क्रीडा क्षेत्रातील तरुण करीत आहेत असा आरोप युवा सेने तर्फे करण्यात येत आहे.

सध्या कुस्ती तसेच सर्वच स्पर्धा सुरू असून या विषयाकडे गांभीर्याने अन्न व औषध प्रशासन मंडळाने लक्ष दिले पाहिजे व अशा संशयित मेडीकल व जिम्सवर धडक भेटी देऊन कारवाई केली पाहिजे असे निवेदन युवासेना धुळे महानगरप्रमुख मनोज जाधव यांनी अन्न व औषध प्रशासनचे प्रभारी अधिकारी देशमुख यांना देण्यात आले. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख हरिष माळी, युवतीसेना जिल्हा अधिकारी सोनी सोनार, उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकटे, मनोज जाधव, सिद्धार्थ करनकाळ, सिद्धेश नाशिककर, जयेश सोनवणे, सुमित चौधरी, आदी युवासेना पदाधिकारी व युवासैनिक उपस्थित होते.

# फुलंब्री तालुक्यात दुष्काळ जाहीर करा : जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव



आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील अपुऱ्या पावसामुळे यंदाचे खरिप पिक हंगाम वाया गेले तर त्यापाठोपाठ रब्बी पिक हंगाम ही हाती येत नसल्याचे स्पष्ट चित्र आहे. यंदा जून ते ऑक्टोबर संपूर्ण पावसाळ्यात गत वर्षीच्या तुलनेत सरासरी च्या पन्नास टक्केही पर्जन्यमान पाऊस झाला नाही. अपुऱ्या पावसामुळे खरिप पिक हंगाम तर गेलेच आता सद्या रब्बी पिक हंगाम ही हाती येत नाही. शेतकऱ्यांनी महागडी बि बियाणे खते औषधी मजुरी खर्च करून पेकपेरा लागवड केली उगवणी ही चांगली झाली परंतु अपुऱ्या व जेमतेम पावसामुळे पिक असून नसल्यासारखे ठरले. मका, कापूस, तूर, बाजरी, भुईमूग, सोयाबीन आदी खरिप पिकात मकाची पावसाअभावी वाढ झाली नाही की कणसे ही आले नाही. शेतकऱ्यांनी ना इलाजाने त्याचा चारा केला. बाजरीची ही तिच स्थिती आहे. मुग उडीद चवळी पावसाअभावी भुर्र झाली, सोयाबीन भुईमूग ही पावसाअभावी जागीच चिकटून आहे. तर कापसाला औषध फवारणी खते वखर आळे व गवत काढणे मरमर मेहनत घेऊन ही फुले कैऱ्याचा अभाव आहे तर वाढही खुंटलेली आहे. परिणामी कापसाचे उत्पादन ही नाममात्र आहे एकदोन वेचणीत कापुस संपणार आहे. त्यात त्याला पाणी दिले तर काही हाती येवू शकते त्यात पावसा अभावी ओढे नाले नदी तलाव कोरडे ठाक पडून आहे. व त्यामुळे विहिरींनी पाणी नाही. एकुण भयाण स्थीती आहे. व शेतकरी बळीराजा खर्च करून हतबल ठरत आहे. केलेला खर्च हाती येत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. तो दुष्काळ केंव्हा जाहीर होईल याच्या प्रतिक्षेत आहे.

संघटनेच्या वतीने आम्ही आपणास आवाहन करतो की आम्ही रस्त्यावर उतरून लोकशाही पद्धतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे आव्हान काशिनाथ जाधव छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांनी केले आहे.

प्रवेश देणे चालू आहे

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई मान्यता प्राप्त व संलग्नित

गीताई सेवाभावी शिक्षण संस्था संचलित

समर्थ GNM नर्सिंग स्कूल

| उपक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | कालावधी | पात्रता | वय |
|---|---|---|---|---|
| GNM | ४० | ३ वर्ष | १२ वी पास (विज्ञान, कला, वाणिज्य) | १८ ते ३५ वर्ष |
| ANM | २० | २ वर्ष | १२ वी पास (विज्ञान, कला, वाणिज्य) | १८ ते ३५ वर्ष |

वैशिष्ट्ये
:: सुसज्ज इमारत :: तज्ञ प्राध्यापक वृंद :: मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेलची व्यवस्था
:: नौकरीची १००% गॅरंटी :: प्रॅक्टिकलसाठी १०० खाटांच्या हॉस्पीटलशी संलग्न
:: मागासवर्गीय मुलींसाठी स्कॉलरशीप लागू (SC, ST)

मोफत प्रवेश...!

* संपर्क : नांदेड रोड, मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड
मो.नं. 8766028429, 9922036771, 9595614111

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFE ROCKSTARZ EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# किशोर कुमार यांची अफलातून कल्पना आणि हास्यकल्लोळ

आधुनिक केसरी

**आपल्या बोलण्याने एखाद्याच्या चेहऱ्यावर हसू फुलविणे सगळ्यांनाच जमते असे नाही. पण हिंदी चित्रपटसृष्टीत बहुविध व्यक्तिमत्त्व म्हणून ख्याती पावलेले अभिनेते-पार्श्वगायक किशोर कुमार यांच्याकडे मात्र हे कौशल्य ओतप्रोत भरलेले होते. आपल्या चेष्टेखोर स्वभावाबद्दल किशोर कुमार चित्रपटसृष्टीत प्रसिद्ध होते. आपले सहपार्श्वगायक किंवा सहकलावंत यांच्याशी चेष्टा-विनोद करण्याची किशोर कुमार यांना सवय होती. १९७४ सालच्या `आप की कसम' या चित्रपटातील एक प्रणयगीत किशोर कुमार यांच्याबरोबर लता मंगेशकर गाणार होत्या. या गीताच्या ध्वनिमुद्रणासाठी दोघे स्टुडिओमधे पोहोचले.**

त्या दिवशी जे गीत ध्वनिमुद्रित होणार होते त्याची अफलातून कल्पना किशोर कुमार यांनी आपल्या गमत्या स्वभावानुसार लता मंगेशकर यांना ऐकविली मात्र आणि लताजींची हसून हसून मुरकुंडी वळली. किशोर कुमार यांचे एक वैशिष्ट्य असे होते, की ते जेव्हा ध्वनिमुद्रणाच्या स्टुडिओत येत तेव्हा आपल्याबरोबर गीत गाणार असलेल्या अन्य पार्श्वगायकांशी भरपूर चेष्टा-मस्करी करत असत. ते स्टुडिओत येताच स्टुडिओतील वातावरण एकदम प्रफुल्लित होत असे. किशोर कुमार यांचे आगमन झाले आहे हे स्टुडिओत उपस्थित असणाऱ्यांच्या ताबडतोब लक्षात येत असे. त्यांचे बोलणे आणि त्यांनी सांगितलेले चुटके यांनी स्टुडिओत हास्याच्या लकेरी उमटत असत. किशोर कुमार यांचा मिश्किल स्वभाव लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्याही चांगलाच परिचयाचा होता. किशोर कुमार यांच्या या स्वभावामुळे आम्ही त्यांच्याबरोबर गीताचे ध्वनिमुद्रण करणार नाही, असे या दोघी भगिनींनी ठरवून टाकले होते. किशोर कुमार यांचा त्यांना त्रास होत असे अशातला भाग अजिबात नव्हता; तर लता मंगेशकर आणि आशा भोसले यांचे म्हणणे होते, की किशोर कुमार यांच्यासमवेत गीताचे ध्वनिमुद्रण करत असताना ते इतके हसवितात की त्यामुळे आमचा आवाज थकतो. आमच्याकडून गीत गायले जात नाही आणि किशोर कुमार स्वतः मात्र आरामात ध्वनिमुद्रण करून निघून जातात. आमचा सगळा जोम हसण्यातच वाया जातो. म्हणून आम्ही किशोर कुमार यांच्या साथीने नाही पण त्यांचे ध्वनिमुद्रण पार पडल्यावरच आमचा भाग आम्ही ध्वनिमुद्रित करू. आणि त्यांनी किशोर कुमार यांचे गीत ध्वनिमुद्रित झाल्यावर गीतातील आपला भाग ध्वनिमुद्रण करणे सुरू केले. पण असे किती दिवस आणि कुठवर चालणार होते? द्वंद्वगीतांच्या ध्वनिमुद्रणासाठी दोन्ही पार्श्वगायक एकाच वेळी उपस्थित असणे अत्यंत गरजेचे होते. काही दिवस असेच चालत राहिले. एका चित्रपटाच्या द्वंद्वगीताचे ध्वनिमुद्रण व्हावयाचे होते आणि ते गीत किशोर कुमार व लता मंगेशकर गाणार होते. त्यावेळी संबंधितांतर्फे लता मंगेशकर यांना सांगण्यात आले, की आपण दोघांनी एकमेकांच्या साथीत ध्वनिमुद्रण केले नाही तर आम्ही अडचणीत येऊ. त्यानंतर लता मंगेशकर किशोर कुमार यांच्याबरोबर ध्वनिमुद्रण करण्यास तयार झाल्या आणि ध्वनिमुद्रणाच्या स्टुडिओत पोहोचल्या. त्या दिवशी `आप की कसम' या चित्रपटातील "सुनो, कहो, सुना, कहा, कुछ हुआ क्या, अभी तो नहीं" या द्वंद्वगीताचे ध्वनिमुद्रण व्हावयाचे होते. या चित्रपटाचे निर्माते होते जे. ओम प्रकाश आणि दिग्दर्शक या नात्याने त्यांचा हा पहिलाच चित्रपट होता. त्यात




राजेश खन्ना, मुमताज आणि संजीव कुमार हे तीन प्रमुख कलावंत होते. गीते आनंद बक्षी यांनी लिहिली होती आणि संगीत दिग्दर्शन राहुल देव बर्मन यांनी केले होते.

लता मंगेशकर यांनी स्टुडिओत प्रवेश करताच किशोर कुमार लगेच त्यांच्या जवळ गेले आणि त्यांना म्हणाले, `लता....लता जरा ऐक तर... एक अफलातून किस्सा तुला ऐकवतो ! यावर लता मंगेशकर त्यांना म्हणाल्या, `दादा प्लीज, आता काही बोलू नका. आधी मुकाटपणे गीत गा ! गीताचे ध्वनिमुद्रण संपल्यावर मी तुमचे सगळे किस्से ऐकेन. यावर किशोर कुमार लता मंगेशकर यांना म्हणाले, की हे बघ हा जो किस्सा मी तुला ऐकविणार आहे त्याचा या गीताशी संबंध आहे आणि म्हणून तू तो ऐकणे फार गरजेचे आहे. ते ऐकताच लता मंगेशकर काहीशा गंभीर झाल्या आणि त्यांना म्हणाल्या, असे असेल तर ऐकवा तो किस्सा ! मग किशोर कुमार यांनी त्यांना विचारले, तू हे गीत वाचले आहेस ? त्या म्हणाल्या, हो वाचले आहे. किशोर कुमार यांनी विचारले, गीत कसे आहे ? लता मंगेशकर म्हणाल्या, चांगलेच आहे. त्यांचे मत ऐकताच किशोर कुमार एक दीर्घ श्वास घेऊन त्यांना म्हणाले लता, या किशोर कुमारच्या डोक्यात एक दृश्य आले आहे. तू अशी कल्पना कर की एक घर आहे. त्या घरात आपण दोघे आहोत आणि एका कमोडवर तू बसली आहेस आणि एका कमोडवर मी ! मी म्हणतोय, हवा चली, घटा रुकी, कुछ हुआ क्या, यावर प्रत्युत्तरादाखल तू म्हणतेस, अभी तो नहीं, कुछ भी नहीं ! किशोर कुमार यांचे हे काल्पनिक दृश्य ऐकून लता मंगेशकर यांना हसू फुटले. यावर किशोर कुमार त्यांना म्हणाले, थांब...थांब तू अद्याप संपूर्ण ऐकलेलेच नाहीस ! यातील कळसाध्याय (क्लायमॅक्स) अद्याप आलेलाच नाही ! बघ, गीताच्या शेवटी गीतकार आनंद बक्षी काय म्हणतात....`जरा-सा कुछ हुआ तो है... !' किशोर कुमार यांच्या तोंडून या किश्श्याचा हा कळसाध्याय ऐकताच लता मंगेशकर खो खो हसत सुटल्या आणि सारा स्टुडिओही हास्यकल्लोळात बुडून गेला.

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# मराठा समाजाला आरक्षण मिळावे...

आधुनिक केसरी

एकेकाळी मराठा समाज खूप श्रीमंत व गडगंज संपत्तीचा मालक होता.जमीन व धनदौलत त्यांच्याकडे खूप होती. त्यांच्या सर्व अर्थिक बाजू भक्कम होत्या. त्यांना कशाचीच कमतरता नव्हती. म्हणावा तेवढा पैसा त्यांच्याकडे होता.तेव्हा त्यांना आरक्षणाची म्हणावी तेवढी गरज नव्हती. परंतू आता काळाच्या ओघात लोकसंख्या वाढत गेली.जमीनीचे तुकडे तुकडे होत गेले.आणि अमाप शेतीचा मालक असणारा मराठा समाज एक दोन एकरावर येऊन बसला आहे. परीणामी तो समाज अर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या दूबळा होऊन बसला आहे.



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आता त्यांना आरक्षणाची नितांत गरज भासत आहे. शैक्षणिक क्षेत्रात आरक्षणावाचून विद्यार्थी अडचणीत येत आहेत. त्यांना मनाजोगे शिक्षण मिळत नाही.शेतकरी वर्गाला शासकीय लाभ घेता येत नाही. येवढ्या अमाप समस्यांना त्यांना रोज तोंड द्यावे लागत आहे. मराठा समाजाचे नेते म्हटले जाणारे खासदार, आमदार व मंत्री मूग गिळून गप्प बसले आहेत.त्यांना मराठा समाजाच्या व्यथा कळत नाहीत.

मराठा समाजाच्या राजकीय नेत्यांकडे आजही अमाप संपत्ती पैसा आहे.संस्था त्यांच्याच ताब्यात आहेत.नगरपालिका त्यांच्याच ताब्यात आहेत. खासदार त्यांचेच आहेत. आमदार व मंत्री त्यांचेच अधिक आहेत. तरीपण हे महाभाग आरक्षण द्यायला तयार नाहीत. इलेक्षण जवळ आले की आरक्षण देण्याचे ढोंग करत आहेत आणि एकदा का सत्ता हस्तगत केली की मग पाच वर्षे आरक्षणाचे नाव सुध्दा काढत नाहीत. मग अजून पाच वर्षे चालढकल करतात. मान्य आहे की सगळाच मराठा समाज गरीब नाही. पण जे मराठा समाजातील लोक गरीब आहेत.

त्यांच्यासाठी काहीतरी तोडगा काढून अर्थिक निकशावर आधारीत त्यांना आरक्षण द्यावे. मला विलासराव देशमुख यांचा आरक्षणाच्या वादावर व्हायरल झालेला एक व्हिडिओ आठवतो. ते म्हणतात की गोपिनाथराव मुंडे ओबिसीचे आहेत. म्हणून त्यांनाच आरक्षणाचा लाभ मिळावा का? अनेक मुंढे व देशमूख रोजगार हमीच्या कामावर आहेत.त्यांचा सुध्दा विचार झाला पाहिजे. केवळ तो देशमूख आहे म्हणून त्यांच्यावर अन्याय करायचा का? तर बिलकूल नाही. मराठा समाजातील प्रत्येक घटकाची छाननी करुन किती गरजू आहेत.किती गरजू नाहीत याची यादी तयार करावी व त्यानूसार त्यांना आरक्षण द्यावे. इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागता.ही मायबाप सरकारला कळकळीची नम्र विनंती आहे. नाहीतर याचे परिणाम भोगावे लागतील....




# श्री शिवराज्याभिषेक सोहळा

आधुनिक केसरी

**श्री शिवराज्याभिषेक शके 350 वर्षानिमित्त पुणे येथील आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील शिवप्रेमी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या उत्कृष्ट लेखन स्पर्धेत माधव ढोबळे या विद्यार्थ्यांच्या लेखाला पहिला क्रमांक मिळाला. तो या ठिकाणी प्रसिद्धसाठी देत आहोत..**

भारताच्या पारतंत्र्यात स्वतंत्र्याचा भाला रोवून सह्याद्रीचा पुत्र छत्रपती झाला, ही गोष्ट साधी नव्हे! श्री शिवराज्याभिषेक सोहळा भारतीय इतिहासातील शौर्य, दृढनिश्चय आणि स्वातंत्र्याच्या अखंड प्रयत्नाचे प्रतीक आहे. सह्याद्रीच्या सुपुत्राला छत्रपतींच्या पदवीवर चढवणारा हा प्रसंग, भारतीय लोकांच्या स्वातंत्र्य लढ्यादरम्यानच्या अदम्य भावनेचा पुरावा आहे. खडबडीत भूप्रदेश आणि समद्ध सांस्कृतिक वारशासाठी ओळखला जाणारा सह्याद्री प्रदेश एका दमदार नेत्याच्या उदयाचा साक्षीदार आहे. जो नंतर संपूर्ण राष्ट्रासाठी आशेचा किरण बनला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वारशाने प्रेरित झालेल्या या नेत्याने वसाहतवादी अत्याचाराविरुद्ध अथक प्रतिकाराचा मार्ग पत्करला. 17व्या शतकातील एक दरूदर्शी नेते छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहेत. सुशासनाची त्यांची तत्त्वे, लष्करी चातर्यु आणि लोकांच्या कल्याणासाठी अतूट बांधिलकी यांनी सह्याद्रीच्या सुपुत्राच्या स्वातंत्र्यलढ्याची ब्लू प्रिंट दिली. छत्रपतींचे मानसन्मान अंगिकारून त्यांनी या महान नेत्याला केवळ आदरांजलीच वाहिली नाही तर त्यांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्पही केला. सह्याद्रीच्या सुपुत्राच्या प्रवासातील सर्वात उल्लेखनीय पैलू म्हणजे भारतासारख्या वैविध्यपर्णू राष्ट्राला एकत्र आणण्याची त्यांची क्षमता. स्वातंत्र्यही भाषिक, धार्मिक आणि सांस्कृतिक सीमांच्या पलीकडे असलेली एक सामान्य आकांक्षा आहे हे ओळखून त्याने कुशलतेने केली आणि समविचारी व्यक्ती आणि गटांची युती केली. श्री शिवराज्याभिषेक सोहळा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी स्रोत आहे. हे आपल्याला आठवण करून देते की स्वातंत्र्याचा पाठपुरावा करण्यासाठी केवळ धैर्य आणि दृढनिश्चय आवश्यक नाही तर कारणाच्या नीतिमत्तेवर खोलवर बसलेला विश्वास देखील आवश्यक आहे. हे सामूहिक कृतीच्या सामर्थ्याचा आणि इतिहासाच्या वाटचालीला आकार देण्याच्या व्यक्तींच्या क्षमतेचा पुरावा आहे. श्री शिवराज्याभिषेक सोहळा भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या भावनेला सामील करतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा आणि स्वातंत्र्याच्या शोधात सह्याद्रीच्या सुपुत्राच्या अदम्य इच्छाशक्तीला ते अमर करते. हा स्मरणपत्र म्हणून काम करतो की स्वातंत्र्याचा पाठपुरावा हा एक कालातीत प्रयत्न आहे आणि अतूट संकल्पाने, अगदी बलाढ्य साम्राज्यांनाही गुडघे टेकले जाऊ शकतात. जय जिजाऊ! जय शिवराय!

माधव ढोबळे



# ते कोण लोक आहेत



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**कौन है ये लोग; असा एक संवाद एका चित्रपटातील नायक परिणामकारकतेने बोलला होता ते वाक्य मला कायमस्वरूपी स्मरणात राहीले. सामान्य माणसाच्या न्याय हक्कासाठी चित्रपट असो वा साहित्य एक सशक्त माध्यम असते आणि त्याचा योग्य वापर झाला की कधी जॉनी एलएलबी तर कधी जय भिम सारख्या चित्रपट कृती बाहेर पडतात आणि मनाला अस्वस्थ करतात. साहित्याचाही थोड्याफार फरकाने तसंच आहे मात्र या ठिकाणी दृश्याची परिणामकारकता नसल्याने साहित्यिकांचा कस जास्त लागत असतो.**

दुर्दैवाने आजच्या काळात मोठ्या प्रमाणात फक्त प्रसिद्धीसाठी गोलमोल लिहिणारे साहित्यिक यांचे प्रमाण जास्त आहे. वैचारिक कुपोषण पाहिले आणि तशामध्ये ते लोक कोण आहेत. हा पांडुरंग सुतार यांचा संग्रह नुकताच वाचण्यात आला की सामान्य माणसाच्या वेदनेला वाचा फोडणारे साहित्यिक अजूनही अस्तित्वात आहेत याची खात्री पटते. आणि मराठीत अजूनही गांभीर्याने लिखाण करणारे कवी आहेत याबाबतची खात्री देता येते. वर्णमुद्रा पब्लिशर्स यांच्याकडून आलेल्या ह्या देखण्या संग्रहात एकूण तीन भागात 47 कविता आहेत. ह्या तीन भागातील पहिला भाग म्हणजे पाठ फिरवून चालत गेलेले लोक हा होय. या विभागातील पहिल्या कदाचित या कवितेत कवी म्हणतात,

मी कविता लिहिली नाही तरी लाल तांबड्या मुरमाड मातीतून सृजनासाठी आसुसलेल्या बीजांतून कोंभ टरारू लागतील असे सांगून कवी कविता लिहिली नाही तरी जगातील कोणत्याही घटनांना विशेष फरक पडणार नाही. जगरहाटी सातत्याने सुरू राहील. निसर्ग त्याच्या ताकतीने स्वतःचे काम करत राहील याची जाणीव असल्याचे सुचित करत असतात. त्याचप्रमाणे कवींनी सुद्धा आपण जगाचे सर्वेसर्वा आहोत ह्या भ्रमात राहू नये असे सुद्धा त्यांना सुचवायचे असावे असे वाटते. मात्र असे असले तरी कवी जगाला आकार देण्याचे काम करतात हे सांगत असताना

कवितेच्या उदास दुपारी या कवितेत-

त्रयस्तासारखा निघून गेला नसता मंटो कवितेच्या अशा उदास दुपारी.... असे कवी म्हणतात तेव्हा कवी प्रत्येक संवेदनशील गोष्टीवर व्यक्त होतो. तो त्रयस्थपणे निघून जाऊ शकत आहे असे सूचित करतात. याच कवितेत देशाच्या फाळणीचे काही संदर्भ कवीने अगदी बेमालूमपणे पेरले आहेत. एखाद्या कवितेत हातोड्याची टकटक करत राहणारे कामगार, तर एखाद्या कवितेत भुकेल्या, पोटूशी, नागव्या स्त्रीकडे पाहून नंतर कॅनव्हास वर तिथे चित्र रेखाटणारा अस्वस्थ असा चित्रकार, नेहमीसारखा होमवर्क करण्याचा कंटाळा येणारी शाळेतील विद्यार्थिनी. हे सर्व लोक आपल्या आजूबाजूला असतात मात्र आपल्या कवितेचे विषय आपल्या आजूबाजूला आहेत ते नेमकेपणाने टिपून शब्दचित्रासारखे ते वाचकांसमोर उभे करण्याचे कसब पांडुरंग सुतार यांना

जमून आले आहे. कधी कधी खेळण्यांशी एकट्याने खेळत बसतात मुले एकट्याने रडूनही घेतात, दमतात रडून रडून अशा ओळीतील भयावह वर्तमान, किंवा त्याच कवितेतील मुलांचे झोपेत बंदुकीचे स्वप्न पाहणेह्या संकल्पना वर्तमान काळातील भावना शून्यता, लहान मुलांचे एकाकी जीवन, त्यामुळे विभक्त कुटुंब आणि त्यातील एकाकीपण त्यातून मुलांना हवी तेवढी सुरक्षितता न मिळणे, यांत्रिक होऊन जाणे यातील मध्यमवर्गीय दुःख कवींनी सूक्ष्मपणे टिपले आहे. खिडकीतून तटस्थतेच्या अत्युच्च टोकावर युद्ध कदाचित नंतर सरून जाईल अशा कवितांमधून जनसामान्याबाबत कवीने केलेले भाष्य महत्त्वाचे ठरते. मात्र अनेकदा ह्या कवितांचा विस्तार अधिक झाला आहे असे वाटत राहते. शांत झोपी गेलेल्या मुलाची कविता या कवितेत प्रेम म्हणजे काय असते? म्हणजे काय? राष्ट्र म्हणजे काय? जमीन, महासागर, स्वातंत्र्य? घर? इतकेच काय तर लेणी, स्मारके, पुतळे ह्यासह धर्म, तत्त्वज्ञान, नीती,अनिती अनेक बाबींचा सूक्ष्म आढावा घेणारी कविता समोर येते. यात युद्धपिपासू सत्ताधिशांच्या अनाठायी दुराग्रहामुळे लाखो सैनिकांचा बळी जातो असा विचार मांडलेला दिसतो. कल्याण टू डोंबिवली या कवितेतही रेल्वे स्टेशन तेथील वातावरण प्लॅटफॉर्म वरील माणसं, त्यांचे तेथे होणारे व्यवहार याबाबत चित्र आपल्या

डोळ्यासमोर उभे राहते. मुंबई आमची मुंबई या कवितेत मुंबईचे वर्णन केलेले आहे, हे वर्णन करत असताना मुंबई स्थितप्रज्ञ ज्ञानेश्वराच्या ओवी सारखी अशा ओळीतून मुंबईमध्ये घडणाऱ्या घटनांचा लोकांच्या मनावर आणि जीवनावर काहीही परिणाम होत नाही, ते स्थितप्रज्ञा सारखे आपले कार्य करत असतात असे कवीला सुचवायचे आहे.

मुंबईप्रमाणे मदुराई, तेथील मीनाक्षी मंदिर याचे वर्णन आपल्याला वाचायला मिळते मात्र त्यात अचानक एखादी ओळ

उसळी घेऊन समोर येते ती अस्वस्थ करते जसे,

बंदिस्त आहे अंधाऱ्या गाभाऱ्यात मीनाक्षी

मिणमिणत्या उजेडात तिच्या डोळ्यातले दुःखही दिसत नाही कुणाला दिसत नाही तिच्या डोळ्यातून खळखळ वाहणारी वेन्गेई स्त्रियांना भारतीय समाजाने मंदिरात देवी करून बसवले तरी प्रत्येक स्त्रीच्या मनातील दुःख कायम राहिले आहे.

तिची बाजू कधी समजून घेतली गेली नाही असे कवीला म्हणायचे आहे. अजिंठा रात्रंदिवस माणसे मरत असताना युद्धे कदाचित, अशा सर्वच कविता वेगळ्या जाणीवांची अनुभूती देणाऱ्या आहेत.

आतल्या आत कुजबुजत असणारे लोक या दुसऱ्या भागात पांडुरंग सुतार यांनी माणसाच्या मनातील अव्यक्त भावना आणि त्या संदर्भाने मना मनाची होत जाणारी तगमग शब्दांकित केलेली दिसून येते. नदीला आलेला पूर आणि त्यात टिटवीचे वाहून गेलेले घर, आणि त्या आकांतातून टिटव्यांचा नव्याने सुरू झालेला संसार ह्या संकल्पनेत अस्वस्थता आणि तगमग यातून सकारात्मक जीवनशैलीचा सकारात्मक संदेश पांडुरंग सुतार यांनी दिलेला आहे. त्याच वेळी या भागामध्ये रेल्वेच्या डब्यात एखादी गरीब परकरी मुलगी पोट भरण्यासाठी गाणे गाताना, प्रवाशांशी लगट करतांना

दिसते, तेव्हा- पोरी गाणे गा, पण पुरुषाच्या अंगाशी लगट नको करत जाऊस असा सल्ला देण्याचा विचार कवी करतात, पण मनात असूनही ते लगेच बोलत नाहीत, तर आपण हा सल्ला पुढच्या वेळी देऊ असा विचार करतात. ही टू बी ऑर नॉट टू बी ची मानसिक अवस्था मुंबईतील मध्यमवर्ग सातत्याने घेऊन

फिरत असतो त्याचे प्रतिनिधित्व या ठिकाणी कवीने केलेले दिसून येते. निरंतर पाऊस पडतोय मधील ओली चिंब धास्ती किंवा मेंढपाळ कवितेतील मेंढपाळाच्या जीवनाची सूक्ष्म कांगोरे टिपणारी निरीक्षण क्षमता आपल्याला या संग्रहात सातत्याने दिसत राहते.




आजच्या वर्तमानावर भाष्य करत असताना कवी ही कोणती वेळ या कवितेत म्हणतात, मुलांचे निरागस जन्म नाहीत माणसांचे माणूसपण होरपळलेले स्त्रियांच्या सृजनशिलतेची अग्नीपरीक्षापाखरांना पंख मिटून घेण्याची शिक्षा निरागसतेचा निर्मम अंत) सत्यपाठी लपलेले सौंदर्याचे मायावी सिद्धांत धैर्याला हात नाहीत... ममतेला स्तन नाहीत.. अहिंसेला बळ नाही... ही वेळ ही कोणती वेळ...? जगण्याला श्वास नाही... मरणाला भय नाही. एकंदरीत बदलत गेलेला भूतकाळ, अस्वस्थ वर्तमान

काळ आणि समोर उभा ठाकलेला भयावह भविष्यकाळ याबाबतचे सखोल चिंतन पांडुरंग सुतार यांनी या संग्रहात सातत्याने केलेली दिसून येते. तळघरात मूक बसून असलेले लोक या भागात पाठमोरा बसून असलेला अनोळखी माणूस या कवितेमध्ये आत्मचरित्रात्मक जाणिवांच्या नोंदी आढळून येतात. जसे बोर्डिंग मध्ये शिक्षणासाठी जाणे, सातवी फायनलची परीक्षा, ग्रॅज्युएट होणे, बेरोजगार फिरणे आणि या सर्वांमध्ये शिक्षणाचा गंध नसलेल्या, आयुष्यभर संसारासाठी खस्ता खाणाऱ्या, मुलांच्या भविष्यासाठी वर्तमानाचा ओझ डोक्यावर घेऊन चालणाऱ्या बापाचं व्यक्तिमत्व अशी अनेक भावनिक गुंतावळ कवींनी एकत्र मांडली आहे.

सृजनसूक्ते; या कवितेतही सर्वसामान्य माणसाच्या मनात असणारे आपल्या सहचारणीचे महत्त्व कवींनी अधोरेखित केले आहे. मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे ही कविता आत्मचरित्रात्मक कविता आहे असे म्हणायला हरकत नाही. पांडुरंग सुतार जेव्हा, बापजाद्या सारखा लाकडातून माणूस उभा करता आला नाही म्हणून मी कविता लिहिली... असे म्हणतात तेव्हा मराठी कविता आता आत्मचरित्रात्मक मांडणी कडे वळू लागली आहे, असे म्हणावे वाटते. हीच जाणीव मला अजीम नवाज राही यांचा तळमळीचा तळ हा संग्रह वाचताना झाली होती. शब्दच आहे तुमच्या माझ्यात संबंध राखून या कवितेतही ज्ञानेश्वर, तुकाराम, तुलसीदास, कबीर ते अगदी बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानापर्यंत पांडुरंग सुतार यांची कविता पोहोचते आणि माणूस नावाच्या बिंदू पाशी थांबते. सारांशाने विचार केला तर कवीच्या प्रातिभ अनुभवाला अतिशय सूक्ष्म अशी निरीक्षण क्षमतेची जोड असून, कवी मनातील कल्लोळ व्यक्त करत असतांना भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ ह्यावर भाष्य करत स्वतःच्या कवितेला पुढे नेत राहतात. प्रत्येक बाबीवर विस्तृतपणे भाष्य करत कवी आपला विषय वाचकांच्या पर्यंत पोहोचवण्यात यशस्वी होतात.

मुक्तछंदामध्ये असलेली पांडुरंग सुतार यांची ही कविता लाघवी आणि अल्हाददायक असून वाचकांना गुंतवून ठेवणारी

आहे. वर्ण मुद्रा प्रकाशनासाठी रोहन कोळी यांनी आकर्षक आणि आशयानुरूप असे मुखपृष्ठ तयार केले आहे. पण अनेकदा मुखपृष्ठाकडे पाहिल्यावर ही महानगरातली गर्दी असून कोरोना काळातील निर्वासितांची गर्दी आहे की काय?

असेही वाटते. अर्थात तसे असले तरी विशेष फरक पडत नाही कारण दोन्ही ठिकाणाचे दुःख, वेदना, संवेदना आणि रोजीरोटी साठी होणारी भटकंती, मनातील राग, आग, आणि त्वेष समान पातळीवर आहे यात शंका नाही. पांडुरंग

सुतार यांच्या पुढील लिखाणासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

**ते लोक कोण आहेत**
**(कविता संग्रह)**
**कवी: पांडुरंग सुतार**
**वर्णमुद्रा प्रकाशन**
**पृष्ठ 150 किंमत 374 /-**

# व्यवसायात विश्वासाहर्ता असावी तरच भरभराट : मठाधिपती हभप रामगिरी महाराज




आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आजचे तरुण नौकरी पेक्षा स्वतःच्या उद्योग व्यवसायाकडे वळत आहे ही राष्ट्र विकास दृष्टया अत्यंत चांगली बाब आहे,मात्र या उच्च विद्याविभूषित तरुणांनी आपल्या उद्योगात अधिकाधिक विश्वासाहर्ता आणण्याची गरज आहे असा सल्ला सरला बेट गोदाधामचे मठाधिपती हभप रामगिरी महाराज यांनी गुरुवार (ता.२६)रो जी श्री स्वामी समर्थ ऑटो सर्व्हिस च्या शुभारंभ प्रसंगी केले.

या उद्योग व्यवसायकडे दुर्लक्ष करू नये, निरर्थक खर्च करू नये, प्राप्त धनाची उधळपट्टी करू नये, त्यांनी प्राप्त धनाचे चार प्रकारे नियोजन असावे असे विशद केले. प्राप्तधन हे उपयोजितासाठी असावे, ते धन वृद्धीपित होणारे असावे तर या धनाची ठराविक रक्कम आपत्कालीन प्रसंग साठी बचत करून ठेवावी व याच धनातून आरोग्यच्या चढ उतार प्रसंगासाठी असावी असेही महाराज म्हणाले,या प्रसंगी आमदार प्रा. रमेश पा. बोरणारे, माजी आमदार भाऊसाहेब पा. चिकटगावकर,डॉ,दिनेश परदेशी, साबेरखान, बाबासाहेब जगताप, राजेंद्र पा. साळुंके, दिनेश राजपूत, कल्याण दागोडे, शैलेश चव्हाण, सचिन वाणी, पारस घाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचलन व प्रास्तविक धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले आभार बिपीन बाबासाहेब इंगळे यांनी मानले. बाबासाहेब इंगळे व सौ. राजश्री बाबासाहेब इंगळे यांनी महाराजांचे पूजन केले. या प्रसंगी ज्ञानेश्वर टेके, शैलेश चव्हाण, संजय बोरनारे, डॉ. बाबासाहेब इंगळे, डॉ.राजीव डोंगरे, डॉ. गणेश अग्रवाल, डॉ. मनोज चव्हाण, रेडिओलॉजिस्ट डॉ. सचिन राजपूत, पंकज ठोंबरे, शंकर मुळे यांच्यासह हभप मधू महाराज, हभप चंद्रकांत महाराज, हभप रामभाऊ महाराज यांच्यासह महिला पुरुष उपस्थित होते.

# पतंजलीतर्फे नवरात्रीनिमित्त आयोजित निःशुल्क योग शिबिराची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** देवी दुर्गेने महिषासुर या राक्षसाचा वध केला. श्रीरामाने रावणाचा वध केला. चांगल्याचा वाईटावर विजयी झाला. सत्याचा असत्यावरती विजयी झाला. प्रतिपदेपासून नवमी पर्यंत नऊ दिवस नांदेड शहरात विविध ठिकाणी देवी समोर पतंजली योग परिवारातर्फे निशुल्क योग शिवीर घेण्यात आली. दहाव्या दिवशी म्हणजेच दसऱ्याच्या दिवशी अशोक नगर हनुमान मंदिर ठिकाणी योग शिबिरांचे सार्वजनिक समापन करण्यात आले. नांदेड शहरातील सर्व योगसादकांनी सकाळी 5.30 ते 6.30 दरम्यान प्राणायाम, आसन, सूक्ष्मव्यायाम, योगिक जॉगिंग, सूर्यनमस्कार, आदिचा सराव केला. सकाळी 6.30 ते 7.00 दरम्यान गरभा, दांडिया, लेझीम खेळ खेळून योग शिबिराची सांगता केली. याप्रसंगी पंढरीनाथ कंठेवाड, शिवाजीराव शिंदे, मारुती उमाटे, किशन वंगाल, सोपानराव मारकवाड, अनिल कामिनवार, अतुल शिंदे, हरिहर नरवाडे, हनुमंत जाधव, राजेश गाडेगावकर, श्रीकांत डोणगावकर, बालाजी कहाळेकर, श्रीराम मोरे, यादगिरी गजल, वैष्णवी नरवाडे, उज्वला जनकवाडे, शिवानंद नरवाडे, सतीश कुबडे, मुंजाजी भोकरकर, अच्युत वायपनकर, गणेश मानसपुरे, श्रीराम भुसेवाड, व्यंकटराव उतकर, दिलीप आघाव, नामदेवराव मोहिते, जनार्दन आठवले, विष्णुदास शिंदे, बाबाराव हंबर्डे, पंडित पाटील, बालाजी वारले, गजानन देशपांडे, शोभा देशपांडे, नंदिनी चौधरी, शुभांगी महात्मे, मीरा कुसळे, सुनिता आघाव, रावते, माया भोयर, मैनाबाई मोहिते, आरती क्षीरसागर, सुनिता वैजवाडे, तृप्ती बंनमेरू, राजू शेट्टी आदी योग सादक उपस्थित होते. शिबिर समापनानंतर सर्व सादकांनी आपसामध्ये भेटी घेतल्या. सोने



आपट्याच्या पानांचे देवाण-घेवाण केली. एकमेकांना शुभेच्छा दिल्या. संस्कृती जपणे हे काळाची गरज आहे, सर्व सण सार्वजनिक साजरी केल्यामुळे आपसात प्रेम आपुलकी सद्भावना वाढते, आनंदी राहणे हा या उपक्रमाचा प्रयत्न होय, असे अनिल अमृतावार यांनी सांगितले.

# भाव नसल्याने सोयाबीन घरातच



सोयगाव तालुक्यात यंदा सोयाबीन पिकाची जास्त प्रमाणात पेरणी केली गेली, पिकेही बहरली पण ऑक्टोबर महिन्यात सोंगणीच्या तोंडावर निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसला. सप्टेंबर महिन्यात जास्त प्रमाणात पाऊस झाल्याने सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अशातच दाणे भरण्याच्या अवस्थेत असलेल्या सोयाबीन पीकांवर येलो मौजेक रोगाच्या प्रादुर्भावमुळे सोयाबीन पीक हातचे गेल्याचे चित्र निर्माण झाले. सोयाबीन सोंगणीकरता पळासखेड टिटवी, सावळदबारा, देव्हारी परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले. शेतमजूर बारा- पंधरा जणांचा समूह करून 3,500 रु एकर दराने सोंगणीला घेऊन शेत सोंगणी पूर्ण करतात. सोयाबीनचे सध्याला भाव 4500 रु क्विंटल दर असून हा दर अपेक्षित नसल्याने शेतकरी नाराज झाले आहेत. दर असमाधानकारक असल्याने शेतकऱ्यांनी सोयाबीन साठवणूकीवर भर दिला आहे. सोयाबीनचे दर वाढतील ही अपेक्षा शेतकऱ्यांची सरकारकडे केली आहे.

# राजे अंबरीशराव आत्राम यांचा अहेरी येथील दसरा महोत्सवात जोरदार घणाघात

## रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता: अहेरी विधानसभा क्षेत्राची प्रचंड दुरवस्था

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** अहेरी इस्टेटचा १५० वर्षांची ऐतिहासिक परंपरा असलेल्या दसरा मोहोत्सवाला महाराष्ट्र, तेलंगाणा, छत्तीसगड ह्या राज्यातील हजारो लोकांची उपस्थिती होती. अहेरी इस्टेटचा १५० वर्षांची ऐतिहासिक परंपरा असलेला दसरा महोत्सव काल अहेरी इस्टेटचे ६ वे राजे श्रीमंत राजे अम्ब्रिशराव आत्राम ह्यांचा मार्गदर्शनाने मोठ्या उत्साहात संपन्न झाले, ह्यावेळी बोलतांना राजे मनाले "दसरा" ही आपली ऐतिहासिक संस्कृती आहे, गेल्या १५० वर्षांपासून अखंडपणे चालू आहे, समोरही शेकडो वर्षे चालू राहील, अहेरी इस्टेटचा दसरा महोत्सवाचे महत्त्व कमी व्हावे ह्यासाठी काही लोकं अनेक प्रयत्न करीत आहेत ते कदापी यशस्वी होणार नाही, तसेच सद्या आपल्या क्षेत्रात सर्वत्र रस्तात खड्डा की खड्डात रस्ता आहे हेच समजत नाही, अहेरी विधानसभा क्षेत्राची गेल्या ४ वर्षात प्रचंड दुरावस्था झाली आहे..ह्या परिस्थितीला जबाबदार कोण आहे..

ह्याचा विचार करून योग्य तो निर्णय घेण्याची वेळ जनतेवर आली आहे असे प्रतिपादन माजी पालकमंत्री मा.राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी अहेरी येतील ऐतिहासिक दसरा मोहोत्सवात बोलतांना जोरदार घणाघात विरोधकांवर केला.!

तत्पूर्वी दसऱ्याच्या दिवशी परंपरे प्रमाणे सकाळी साईबाबा पालखी अहेरी राजनगरीचा मुख्य मार्गाने राजेंचा उपस्थितीत काढण्यात आली तर संध्याकाळी ऐतिहासिक पालखीत विराजमान होहून श्रीमंत राजे अम्ब्रिशराव महाराज यांनी सीमोल्लंघन करीत गडअहेरी येथे शमीचा वृक्षांचे पूजन तथा गडी मातेचे पूजन करीत पालखी राजमहालात परत आले, ह्यावेळी अहेरी राजपरिवारासाचे सर्व सदस्य तसेच ह्या दसरा मोहोत्सवाला महाराष्ट्र, तेलंगाणा, छत्तीसगड ह्या राज्यातील हजारो लोकांची उपस्थिती होती..!!

# ३७ कोटींचे एमडी ड्रग्स जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**पालघर :** मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेच्या पथकाने पालघर जिल्ह्यातील मोखाडा येथे सुरु असलेल्या अमली पदार्थाच्या कारखान्याच पर्दाफाश केला असून तब्बल ३७ कोटीचे एमडी नामक अमली पदार्थ जप्त केले. या प्रकरणी एकूण ७ आरोपींना अटक केली आहे. या आरोपीकडून पिस्तुल आणि काडतुसे असा साठा देखील जप्त करण्यात आला आहे. अमली पदार्थांची विक्री करणारे काही आरोपी भाइंदरमधील एका लॉजमध्ये असल्याची माहिती मीरा भाईंदर बसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा १ च्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत गांगुर्डे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी भाईंदर येथील विन्यासा रेसिडन्सी येथे छापा मारून ४ जणांना ताब्यात घेतले होते. त्यांच्याकडून २५१ ग्रॅम एमडी, गावठी पिस्तुल आणि काडतुसे जप्त करण्यात आली होती. त्यांच्या चौकशीत या अमली पदार्थाच्या कारखान्याचा उलगडा झाला. यातील एक आरोपी चंद्रशेखर पिंजार याने पालघर जिल्ह्यातील मोखाडा येथील त्याच्या शेतघरात (फार्म हाऊस) एमडी बनविण्याचा कारखाना तयार केल होता. तेथे पोलिसांनी छापा टाकून एमडी हे अमली पदार्थ, ते तयार करण्यासाठी लागणारी रसायने, उपकरणे जन करण्यात आली. या एकूण कारवाईत एकूण ३७ कोटींची एमडी (मॅस्ट्रॉन) हे अमली पदार्थ, २पिस्तुल, काडतुसे असा साठा जम करण्यात आला आहे. एवढया मोठया प्रमाणावर अमली पदार्थ जर करण्याची तसेच अमली पदार्थांचा कारखाना उघडकीस आणण्याची ही पालघर जिल्ह्यातील पहिलीच कारवाई असल्याचे पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा)अविनाश अंबुरे यांनी सांगितले.



# मराठा समाजाच्या वतीने साखळी उपोषण

## मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण मिळावे

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण मिळावेत या मागणी साठी जिंतूर तालुक्यातील चारठाणा, मोठा, दगडचोप, वाघी, देवगाव फाटा यांच्यासह अनेक गावात मराठा समाज बांधव समाजाच्या वतीने साखळी अमरण उपोषण दि.२५बुधवारपासून येथील बस स्थानक परिसरातील विविध सोसायटी कार्यालयच्या समोरील परीसरात येथील सरपंच अनिरुद्ध चव्हाण, निलेश चव्हाण, कैलास देशमुख, रूस्तुम देशमुख, आकाश चव्हाण, महेश चव्हाण, प्रताप चव्हाण, विक्रम देशमुख, विशाल देशमुख, दत्ता चव्हाण, जगदीश देशमुख, विठ्ठल चव्हाण, ऋषिकेष राऊत, संतोष चव्हाण, सुनील चव्हाण, रमेश देशमुख, माऊली चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, बबनराव संवडतकर अरूण चव्हाण, अमोल देशमुख, वैभव देशमुख, मुकुंद चव्हाण, कान्हा चव्हाण, अप्पासाहेब देशमुख दिपक देशमुख, अर्जुन चव्हाण यांच्यासह येथील सर्व सकल मराठा समाज चारठाणा या उपोषणास बसत आहेत.

# कन्नडला संघर्षकन्या संजनाताईंचा एल्गार; विधानसभेची तयारी

## साधू -संतांच्या हस्ते जनसंपर्क कायालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** केंद्रीय मंत्री रावसाहेव दानवे यांची कन्या संजनाताई जाधव या कन्नडच्या राजकीय मैदानात उतरल्या असुन कन्नड सोयगाव विधानसभेसाठी कंबर कसल्याचे चित्र दिसुन येत आहे. कन्नड चाळीसगाव रोडवर संजनाताई जाधव जनसंपर्क कार्यालयाचे मोठ्या उत्साहात उदघाटन करण्यात आले. विशेष म्हणजे तालुक्यातील साधु संतांच्या हस्ते जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले या वेळी बोलतांनी म्हणाल्या कन्नड सोयगाव मतदार संघात आतापर्यंत पडदया आड राहुन नागरीकांच्या वेगवेगळ्या समस्या मी कित्येक वर्षांपासून सोडवत होते. परंतु आता मी समोर आली आहे पडदयामागे राहनार नाही तसेच जनसंपर्क कार्यालय स्थापन करण्याचा उद्देश म्हणजे कन्नड सोयगाव मतदार संघातील नागरीकांचे प्रश्न सुटावे म्हणून या जनसंपर्क कार्यलयाचे उदघाटन करण्यात आले आहे. अश्या बोलतांनी म्हणाल्या. यावेळी महामंडेलेश्वर शनिभक्त सुखदेव महाराज, गोपालनंदगिरी महाराज रामेश्वरानंदगिरी महाराज सर्वचैतन्य महाराज महंत वाल्हेराजबाबा आनंदचैतन्य महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती डॉ. मनोज राठोड कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती जयेश बोरसे, सदस्य शाईनाथ अल्हाड, प्रकाश प्रकाश अग्रवाल, कृष्णा हार्दे, किशोर पवार, एस. बी. आकोलकर, रामेश्वर घनकर, आयास शहा, संतोष पवार, अनिल अल्हाड, रामेश्वर निकम, आदित्य गर्जे, बबलु पाटील इत्यादींची उपस्थीती होती.





चंद्रपूर येथील बंगाली कॅम्प परिसरातील दुर्गा देवी हे चित्र टिपलंय आमचे जिल्हा प्रतिनिधी शाम हेडाऊ यांनी.

# वहाळमध्ये पर्यावरणपूरक दसरा गणेशोत्सव उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड :** जिल्ह्यात दसरा सणाच्या दिवशी अनेक ठिकाणी दसरा गणेशोत्सव साजरे करतात. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर गणेशमूर्ती विराजमान होते. ही प्रथा अनेक वर्षापासून कोकणातील जिल्हयात सुरु आहे. अशीच परंपरा पनवेल तालुक्यातील वहाळ गावात पाटील बंधू व मित्र परिवार वहाळ यांच्या तर्फे गेली १६ वर्षे अविरतपणे सुरू आहे. यंदाचे दसरा गणेशोत्सवाचे हे १७ वे वर्ष आहे. पाटील परिवार व वहाळ मित्रपरिवार च्या वतीने सुंदर अशी गणेशमूर्ती बसविण्यात आली आहे. या ठिकाणी दररोज आरती,महाप्रसाद, सामुदायिक हरिपाठ व भजन असे धार्मिक य कार्यक्रम पार पडले. गणेशोत्सवामध्ये गणेश मूर्तीच्या आजू बाजूला आकर्षक अशी विदयुत रोषणाई करण्यात आली होती. तसेच पर्यावरण पुरक अशा नैसर्गिक साहित्यांचा वापर करण्यात आला होता. साई मंदिर वहाळचे संस्थापक रविशेठ पाटील याच्या संकल्पनेतून दरवर्षी वहाळ गावात दसरा गणेशोत्सव साजरा केला जाते. रवीशेठ पाटील,अरुण दापोलकर, बाळाराम पाटील तसेच पाटील बंधू व मित्र परिवार वहाळ दसरा गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष विशाल पाटील, मंडळाचे उपाध्यक्ष संदिप पाटील,सचिव सुनील पाटील, खजिनदार - रणधिर पाटील, सदस्य राजेंद्र पाटील, सुधीर पाटील, रणजित पाटील, संगीत पाटील, सुशील पाटील, प्रशांत पाटील, आदी ४० हुन अधिक मंडळाचे सदस्य यांनी दसरा गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.दिनांक २४/१०/२०२३ रोजी विराजमान झालेल्या गणेशमूर्तीची गुरुवार दिनांक २६/१०/२०२३ रोजी मोठया थाटामाटात मिरवणूक काढून विसर्जन करण्यात आले.

# नीरा ते लोणंद रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुणे-मिरज रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम वेगाने सुरू



आहे. त्यातील नीरा ते लोणंद स्थानकांच्या दरम्यान दुहेरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गावर रेल्वे गाडीची प्रति तास ११७ किलोमीटर वेगाची चाचणी यशस्वीपणे घेण्यात आली. त्यामुळे या मार्गावर आता गाड्यांचा वेग वाढणार आहे. रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांनी नीरा ते लोणंद या स्थानकांदरम्यानच्या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाची पाहणी केली. हा मार्ग ७.६४ किलोमीटर लांबीचा आहे. या पाहणीनंतर त्यांनी या मार्गावर गाड्या चालविण्यास संमती दिली. त्यामुळे नीरा-लोणंद या दरम्यान आता दोन्ही मार्गांवरून रेल्वे वाहतूक होईल. त्यातून गाड्या सुरळीत आणि वेगाने धावण्यास मदत होईल. या वेळी अरोरा यांच्यासोबत निर्माण विभागाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी विवेक कुमार गुप्ता, विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# तोफांची सलामी, फटाक्यांची आतषबाजी, पालखी निघते मयूरेश्वराची

आधुनिक केसरी न्यूज

**विजयकुमार हरिश्चंद्रे**

**मोरगाव :** महाराष्ट्रात लक्षवेधी ठरलेला विजयादशमीचा उत्सव म्हटले की, ऐतिहासकालीन मोरगावाचा मर्दानी दसरा डोळ्या समोर उभा राहतो विग्नहर्ता मंगलमूर्ती मयुरेश्वर गजाननाचा पालखी प्रस्थान सोहळा कारण येथें दिली जाते तोफांची सलामी तर केली जाते फटाक्याची अतिशबाजी रंगीबेरंगी फटकायाने आसमनत बहरून जातो. सिमोलंघणासाठी निघालेल्या राजेशाही, ऐतिहासिक व सामाजिक एकतेचे प्रत्येक असणारा दिमाखदार व अभूतपूर्व राजेशाही पालखी सोहळा मोठ्या थाटामाटात उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला. ही मिरवणूक





शोभायात्रा सुमारे साडेचौदा तास शोभेची दारूच्या आतषबाजीत चालली.

श्री मयुरेश्वराच्या मंदिरात सीमोलंघनचे वेळी पालखी प्रस्थान होते तदनंतर विजयादशमीच्या दसरा निमीत्त गणेशभक्ताना सीमोलंघनास मंदिराभोवती प्रदक्षिणा घालताना पालखीसमोर ग्रामस्थ मानक-यानी बनवीलेले शोभेच्या नळीची आतषबाजी केली जाते. ही पालखी मंदिरात येई पर्यंत अखंड चालते. यासाठी विविध ठिकाणी ऐतिहासिक तोफांची सलामी दिली जाते. राजेशाही थाटात मंगळवार रात्री 8 वाजता निघाली. दरम्यान मंदिरातून पालखी बाहेर निघताना अनेक गणेश भक्त पालखी ओलांडण्यासाठी दुतर्फा बसलेले पाहावयास मिळाले पालखीच्या अग्रभागी पाच मानाच्या तोफा, त्यानंतर पाच, सनई, चौघड्याच्या बैलगाड्या होत्या, त्यामागे राजेशाही पालखी निघाली पालखीसोबत अब्दागिरी, छत्र्या, चवऱ्या, असा लवाजमा होता. पालखीचे नियोजन व मार्गदर्शन किशोर वाघ यानी केले , ग्रामस्थ तरुणाई, जय गणेश तरुण, मंडळ, श्री मोरया प्रतिष्ठान, सोनबा ग्रुप यांनी विशेष सेवा दिलीजाते उत्तम शिस्तबद्ध पद्धतीने गणपतीचा जयजयकार केला जातो श्री गणेशाचे मुस्लिम भक्त उत्तम चित्रकार अकबर पठाण यांच्या कलाकृतीतून भला मोठा रावण उभा केला जातो उत्तम रचना बद्ध पद्धतीने नक्षीदार फटाक्याच्या उभारलेल्या कलाकृती कारंजा पद्धतीने उडवला जाणारा दारूगोळा पालखीची राजेशाही मिरवणूक असा विजयादशमी आनंद सोहळा याची देही याची डोळा पाहवयास मिळतो सिमोलगन समय सारा असामंत रंगीबेरंगी होतो आणि मग रावण दहन केले जाते.

# परहर बुद्रुक येथे रांगोळीतून साकारली दीक्षाभूमी

आधुनिक केसरी न्यूज

**तरडगाव :** अशोक विजयादशमी आणि ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन



दिनाचे औचित्य साधून परहर बुद्रुक ता. फलटण येथे संम्बोधी बुध्दविहारात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना रमाबाई महिला मंडळ व प्रमुख पाहुण्यांकडून पुष्पहार अर्पण करत सर्व बौद्ध उपासक आणि उपासिकांनी सामुहिक बुध्द वंदना घेतली. प्रमूख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करण्यासाठी बौद्ध धम्माचे अभ्यासक प्रा.शिवाजी सावंत आणि शंकर कांबळे उपस्थित होते.या दिनाचे विचारमंथन करून हा दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. १९५६ साली विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नागपुर येथे स्वतः बौद्ध धम्माची दीक्षा घेतली अन लाखो अनुयायांना सुध्दा दीक्षा दिली. अशोक विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने लाखोंचा जनसमुदाय हा दरवर्षी दीक्षाभूमीवर जात असतो. देशभरात ठीक ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित केले जात असतात. आज हीच दीक्षाभुमी प्रेरणास्रोत बनली आहे.या दिनाचे महत्व लक्षात घेऊन संम्बोधी बुध्दविहारात रांगोळीच्या माध्यमातून सुरेख अशी दीक्षाभूमीची प्रतिकृती रेखाटण्यात आली असून याच रांगोळीतुन दीक्षाभूमीस अभिवादन करण्यात आले. पंचशील ध्वज हे बौद्ध धम्माचे प्रतीक समजले जाते.पंचशील ध्वजात जे रंग समाविष्ट करण्यात आलेले आहेत.या पाच रंगांमध्ये दीक्षाभूमी साकारलेली आहे. तसेच रांगोळीच्या साहाय्याने धम्मचक्र प्रवर्तन दिवस असे लिहिण्यात आले. ही रांगोळी अनुष्का राजू मोरे या मुलीने साकारली असून ही रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या रांगोळीबद्दल विशेष कौतुक ही करण्यात आले.प्रा. शिवाजी सावंत व शंकर कांबळे यांनी विशेष मार्गदर्शन केले.सम्राट अशोक तसेच बौद्ध धम्माबद्दल माहिती सांगण्यात आली.संम्बोधी संघटनेचे अध्यक्ष राजू मोरे यांनी प्रास्ताविकपर मनोगतातून अशोक विजयादशमी आणि ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कांतेश मोरे, प्रज्वल मोरे, बबन मोरे, सुमित मोरे, तनुष्का मोरे, अनुष्का मोरे आदींनी मनोगते व्यक्त केली.लीना मोरे,अनिता मोरे,रूपाली मोरे, रंजना मोरे, कलाबाई मोरे, शकुंतला मोरे, वैजंता भालेराव,सीता मोरे आदींसह बौध्द उपासक उपासिका उपस्थित होते.

# लहुजी शक्ती सेनेच्या प्रदेश महासचिवपदी बालाजी गायकवाड यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ



कसबे तसेच प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी विजयादशमीचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य कमिटीच्या निवडी जाहीर केल्या. यामध्ये मौजे डिकसळ तालुका कळंब जिल्हा धाराशिव येथील रहिवासी असलेले तसेच गेली सोळा वर्षांमध्ये कळंब तालुकाध्यक्ष ते धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष, जिल्हा संपर्कप्रमुख, प्रदेश कार्यकारिणी सदस्य, कोर कमिटी जिल्हाध्यक्ष असे विविध पदे भूषविलेले व महाराष्ट्रभर परिचीत असलेले चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते बालाजी गायकवाड यांची लहुजी शक्ती सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश महासचिव पदी निवड केल्याचे जाहीर करण्यात आले. सदर निवडीमुळे राज्यरातील कार्यकर्त्यांमध्ये व मातंग समाजामध्ये नवचैतन्य उत्साह संचारला असून लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे, राष्ट्रीय अध्यक्ष प्राचार्य डॉ. माधवराव गादेकर, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे, युवक प्रदेशाध्यक्ष सचिन क्षीरसागर, महिला प्रदेशाध्यक्षा सौ.मायाताई लोंढे,विद्यार्थी आघाडी प्रदेशाध्यक्ष ॲड. हेमंत खंदारे, राज्य उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड, राज्य प्रवक्ते प्रा.दयानंद कांबळे यांनी स्वागत करून निवडी बद्धल शुभेच्छा दिल्या आहेत.

# वाहतूक कोंडी सुटणार

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** चाकणमधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेतल्या जाणार आहेत. तळेगाव, आंबेठाण चौकातील महाराष्ट्र शासनाच्या एसटी बसचे थांबे शंभर मीटर पुढे नेले जाणार आहेत. मजूर अड्डा दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात येणार आहे. येत्या सात दिवसांत अतिक्रमणे काढून टाकण्याचा निर्णय विभागीय आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीत झाला. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याची शक्यता आहे. चाकण परिसर हा अत्यंत वेगाने विकसित होणारा औद्योगिक परिसर आहे.

रहिवाशी भागही वाढत आहे. कामगार वर्ग, उद्योजक, साहित्याची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असलेले अत्यंत वर्दळीचे ठिकाण आहे.




# कन्नड येथे मराठा समाजाच्या वतीने साखळी उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी साखळी उपोषणाला बुधवारी (दि.२५) ऑक्टोंबर रोजी पिशोर नाका येथे सुरुवात करण्यात आली. दरम्यान वैजापुरचे आमदार रमेश बोरणारे कन्नड शहरात आले संतप्त मराठा तरुणांनी गाडी आडवत त्यांना आरक्षणाचा विषयीचा जाब विचारला. (दि.२८) तारखेपर्यंत चालणाऱ्या या साखळी उपोषणाला शहरातील दररोज वेगवेगळ्या कॉंलनीत मराठा बांधव बसणार आहे.शहरालगत असलेल्या अंधानेर, रेल, नावडी, मक्रणपुर, बनशेंद्रा, डोणगाव, उपळा, चिकलठाण, दाभाडी, बहिरगाव, हिवरखेडा नांदगिरवाडी, भोकनगाव, निमडोंगरी, हिवरखेडा गौताळा आदी गावातील मराठा समाज बांधवांनी परिवारासोबत साखळी उपोषनात सहभागी व्हावे. शहरातील मराठा समाजाच्या वतीने सांगण्यात आले आहे.



# भूसंपादन करार रद्द करण्याच्या मागणीवर अंबुजाचे प्रकल्पग्रस्त ठाम

## व्यवस्थापन चाल-ढकल करत असल्याचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या निर्देशानुसार राजुरा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी रवींद्र माने यांनी आज 25 ऑक्टोबर रोजी दुपारी 3 वाजता अंबुजा सिमेंट कंपनीचे प्रकल्पग्रस्त तसेच कंपनी व्यवस्थापनाचे प्रतिनिधी यांच्या सोबत उपविभागीय कार्यालयात घेतलेल्या बैठकीत 98 प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्यासंदर्भात कोणताही ठोस निर्णय कंपनी व्यवस्थापनाने घेतला नाही. त्यामुळे अंबुजा सिमेंट कंपनीचा भूसंपादन करार रद्द करण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांचे नेते जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष पप्पू देशमुख यांनी बैठकीत लावून धरली. यावेळी बैठकीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने पाठवून समोरील कारवाई करण्याचे आश्वासन उपविभागीय अधिकारी माने यांनी प्रकल्पग्रस्तांना दिले.

6 ऑक्टोबर रोजी अंबुजा प्रकल्पग्रस्तांनी उपरवाही येथील अंबुजा सिमेंट कंपनीच्या जवळ टॉवर वर चढून 16 तास आंदोलन केल्यानंतर जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी 9 ऑक्टोबर रोजी अंबुजा सिमेंट कंपनीचे प्रकल्पग्रस्त, कंपनी व्यवस्थापनाचे प्रतिनिधी तसेच जिल्हा प्रशासनातील संबंधित अधिकारी यांचेसह नियोजन भवनात बैठकीचे आयोजन केले होते. 98 बेरोजगार प्रकल्पग्रस्त यांना नोकरी देण्याच्या संदर्भात 15 दिवसांत योग्य ती माहिती देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी या बैठकीत कंपनी व्यवस्थापनाला दिले. जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या निर्देशानुसार आज दिनांक 25 ऑक्टोबर रोजी राजुरा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी रवींद्र माने यांच्या कक्षात प्रकल्पग्रस्तांना अंबुजा सिमेंट कंपनीत नोकऱ्या देण्याबाबत बैठक बोलण्यात आली. या बैठकीला राजुऱ्याचे उपविभागीय अधिकारी रवींद्र माने यांचे सह कोरपण्याचे तहसीलदार प्रकाश व्हटकर, प्रकल्पग्रस्तांचे नेते पप्पू देशमुख, अंबुजा सिमेंट कंपनीचे प्रतिनिधी, अनिल वर्मा, के.सुब्बु, श्रीकांत कुंभारे, महेंद्र ठाकरे, नितीन झाडे तसेच प्रवीण मटाले, सचिन पिंपळशेंडे, आकाश लोडे, निखिल भोजेकर ,चंदू झाडे, तुषार निखाडे, अविनाश विधाते, कमलेश मेश्राम, विकी मेश्राम, शंभू नैताम, भोजी सिडाम इत्यादी प्रकल्पग्रस्त उपस्थित होते. यापूर्वी उपजिल्हाधिकारी भूसंपादन व पुनर्वसन यांनी केलेल्या चौकशीत अंबुजा सिमेंट कंपनी व्यवस्थापनाने भूसंपादन कराराचा भंग केल्याचे सिद्ध झाले आहे. शासनाने कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावून दीड वर्षाचा कालावधी लोटला. मात्र जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करून या प्रकरणात चाल-ढकल करण्याचा प्रयत्न कंपनी व्यवस्थापन करीत आहे. 98 प्रकल्पग्रस्तांना स्थायी नोकऱ्या देण्याबाबत कंपनी व्यवस्थापन गंभीर नसल्याचे सिद्ध होत असल्याने बैठकांचा फार्स करण्या ऐवजी शासनाने अंबुजा सिमेंट कंपनीचा भूसंपादन करार रद्द करण्याची दीड वर्षापासून प्रलंबित असलेली कारवाई तातडीने पूर्ण करावी ही प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे.

# इगतपुरी तालुक्यातील सकल मराठा समाजातर्फे गावागावात लागले फलक

## गावबंदीच्या फलकाने सर्वपक्षीय पुढारी अडचणीत

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून सरकारला दिलेली चाळीस दिवसांची मुदत संपली असून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा बुधवारपासून अंतरवली सराटी येथे आपले दुसऱ्या टप्प्यातील अमरण उपोषण शस्त्र हाती घेतल्या मुळे राज्यभरातील सकल मराठा समाज शासनाच्या विरोधात आणि मराठा समाजाच्या आरक्षणा विरोधातील राजकीय पुढारी यांच्या विरोधात एकवटला आहे. जो पर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत जिल्ह्यातील आणि तालुक्यातील एकाही राजकीय पुढाऱ्यांनी आमच्या गावात प्रवेश करू नये. जर का प्रवेश केलाच तर पद्धतशीरपणे मराठा समाजाच्या रोषाला तुम्हाला सामोरे जावे लागेल, अशा आशयाचे मोठ मोठे फलक,डिजिटल बॅनर इगतपुरी तालुक्यातील मराठा समाजच्या गावागावात लागले आहेत. इगतपुरी तालुक्यात नव्हे तर संपूर्ण नाशिक जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात असे बॅनर चौका चौकात लागले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील खासदार,आमदार,मंत्री,माजी मंत्री,सर्वपक्षीय पुढारी यांच्या अडचण मोठी वाढली आहे.

राज्यातील सकल मराठा समाजाला मिळावे यासाठी जालना जिल्ह्यातील मनोज जरांगे पाटील या संघर्ष योध्याने आंतरवाली सराटी येथे काही दिवसांपूर्वी उपोषण केलेले होते. याठिकानी त्यानी राज्यभरातील जवळपास पंचविस ते तीस लाख उपस्थित मराठा समाजाचा मेळावा घेवून शासनाल 24 तारखेपर्यंत आरक्षण मिळावे असे आवाहन केले होते. 24 तारखेपर्यंत जर आरक्षण मिळाले नाहीच तर मग मात्र समाजाला वेगळी भूमिका घ्यावी लागेल असे पत्रकार परिषदेत सांगितले होते. या पार्श्वभूमीवर 24 ची मुदत संपूण आता आज 26 उगवली असून बुधवारपासुन जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषण सुरु केल्याने आता त्यांचे लोन पुन्हा एकवार राज्यभर पसरत आहेत. त्यात कुणीही उठ सूट आरक्षण विरोधी भूमिका घेवून नाहक वादाला खतपानी घालत असल्याने मराठा समाजाने अशा पुढय-यांना च गावबंदी करुण टाकली आहे. तसे फलक आता गावागावात लागले आहेत. विशेष म्हणजे अनेक गावे,ग्रामपंचयती पुढारी लोकांच्या गावबंदीचा ठराव करुण घेत आहेत. त्यामुळे उद्घाटन,भूमिपूजन, किंवा इतर सोहळा असेल किंवा खाजगी कार्यक्रम असेल अशा कार्यक्रमात जाण्यासाठी पंचाइत झाली आहे. पुढच्या काही दिवसांत राज्यभरातील गावांमध्ये पुढारी लोकांना फ़िरने देखील दुरापस्त होईल असे वातावरण तयार झाले आहे. दिवाळी सण ऐन तोंडावर आला आहे. अशा वेळी राजकीय नेते मंडळी आपल्या लॉबित हमखास शुभेच्छा देण्यासाठी जात असतात,त्यांची फार मोठी पंचाइत झाली आहे.




मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे पाटील यांनी लढा पुकारला आहे . काही लोक त्यांच्या या आंदोलनाला आणि आमच्या आरक्षण मागनीला जो काही विरोध करत आहेत त्यांच्या विषयी समाजातर्फे रोष व्यक्त केला जात आहे . आणि त्यामुळे राजकीय पुढारी लोकांना गाँव बंदीचा विरोध केला आहे . **करण गायकर,संस्थापक छावा क्रांतिवीर सेना**

# सुलतानपूर येथे साखळी उपोषणाला सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलतानपूर येथे सकल मराठा समाजातर्फे बुधवार २५ ऑक्टोबरपासून साखळी उपोषणाला सुरूवात करण्यात आली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे बुधवारपासून आमरण उपोषणाला सुरूवात केली आहे.

जरांगे पाटील यांनी सकल मराठा समाजाने मराठा आरक्षणासाठी सर्कल, गावपातळीवर साखळी उपोषण करावे, असे आवाहन सकल मराठा समाजबांधवांना केले होते. जरांगे पाटील यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत बुधवारी येथील मारोती मंदिरासमोर ग्रामस्थांनी साखळी उपोषणाला सुरूवात केली. सकाळी छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हारार्पण करून या साखळी उपोषणाला सुरूवात करण्या आली. यावेळी उपोषणकर्त्यांनं एक मराठा लाख मराठा, आरक्षप आमच्या हक्काचे, नाही कुणाच्य बापाचे आदी घोषणा देत गिरजा नद थड दणाणून सोडला होता. साखळ उपोषणापूर्वी ग्रामस्थांनी सर्वपक्षी नेत्याना आरक्षण मिळेपर्यंत गावबंदीचा निर्णय घेतला आहे साखळी उपोषणात तरूणांपासू ते वयोवृद्धापर्यंत सकल मराठ समाजबांधव सहभागी झाले.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विजयादशमी दिमाखात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुधीर कोर्टीकर**

**छत्रपती संभाजीनगर :** सिडकोच्या परिसरातील चंद्रगुप्तनगरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बच्चीत्तरसिंग यांची उपस्थिती तर प्रमुख वक्ते म्हणून राहुल देशपांडे यांची उपस्थिती होती. आपल्या भाषणात प्रमुख पाहुणे बच्चीत्तरसिंग घई म्हणाले आज आपल्या देशात सर्व हिंदूनी संघटीत होऊन कार्य करण्याची गरज आहे. तरच आपणं आपल्या देशासाठी काही करु शकू. तर प्रमुख वक्ते राहुल देशपांडे म्हणाले आपले परमपूज्य हेडगेवार यांनी विजयादशमीच्या दिवशीच संघाची स्थापना केली होती. त्याच बरोबर अनेक पौराणिक ऐतिहासिक संदर्भ त्यांनी दिले. माननीय प्रांत संघचालक श्री अनिलजी भालेराव सरांच्या ऊपस्थीती, तसेच केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड तसेच कबीनेट मंत्री महाराष्ट्र राज्य श्री अतुल सावे यांची उपस्थिती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमीच्या कार्यक्रमासाठी सर्वांनाच बळ देणारी ठरली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमीच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून संघाच्या सर्व स्वयंसेवकांनी अतिशय सुंदर शिस्तबध्द संचलन केले. त्यानंतर प्रेरणादायी गीतेही सादर केली. संचलन मार्गावर नागरिकांनी घातलेल्या सडा-रांगोळीने आणि केलेल्या पुष्पवृष्टीने संचलनाचे दृष्य स्वयंसेवकांचे मनोबल वाढवणारे होते. त्यामुळे संचलन मनमोहक व लक्षवेधी झाले. शिस्त, निष्ठा व समर्पणामुळेच हा उत्सव सर्वांना प्रेरणादायी ठरावा इतका सुरेख झाला हे बाकी खरं. संपूर्ण कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ.सूर्यकांत शिरपेवार, सुनिल बारसकर, हरिश्चंद्र सोनी, प्रभाकर काळुसे, राजकुमार ढवारे, प्रतिक शिवाजीराव शिरसे, सुदीप चौरे, विजय लेकुरवाळे, व्यंकटरमण रामिनवार, समीर कुलकर्णी, गणेश गारखेडकर, प्रदीप पोपले, शशिकांत पाडळकर, सतीश नारखेडे, सतीश पाठक, जयप्रकाश भोईरेकर, प्रसाद पैठणकर, नितीन बारपांडे, सुमंत गोले, विजय खनाळे, रमाकांत जगत, अरुण जोशी, रविंद्र बिंदू, गजानन देशमुख, विजय मठपती यांनी विशेष परिश्रम घेतले. राज्याचे सहकार मंत्री अतुल सावेनी सुधीर कोर्टीकर यांनी सजवलेल्या रांगोळ्याची मुक्त कंठानी प्रशंसा केली.

# चर्चेनंतर महेश जेधे यांचे उपोषण तात्पुरते मागे

आधुनिक केसरी न्यूज

**निरा :** सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या समोर विविध मागण्यांसाठी २५ ऑक्टोबर रोजी शिवतक्रार-निरा येथील सामाजिक कार्यकर्ते महेश जेधे हे आमरण उपोषणास बसले होते.रात्री अकरा च्या दरम्यान एमडी यांच्या भेटीने व सर्व प्रश्नाबाबत सकारात्मक रित्या चर्चा झाल्याने हे आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्याचा निर्णय आंदोलनकर्ते महेश जेधे यांनी घेतला. परंतु या आंदोलन स्थळी महेश जेधे यांना असुविधांचा सामना करावा लागल्याने कारखान्याप्रति त्यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.काखान्याने लाइट देखील लावून दिली नाही.बाथरुमला देखील लॉक लावले, अशी सभासद बांधवांसाठी सोय करत असतात. मग ही किती हुकूमशाही आहे हे बघा ? असा सवाल महेश जेधे यांनी ।आंदोलनानंतर उपस्थित केला.
आंदोलन मागे घेतल्यानंतर महेश जेधे म्हणाले की,एमडी यांनी रात्री ११:०५ वाजता भेट देऊन, शिवतक्रारवाडी गावातील अनेक तरुण शेतकरी सभासद व सभासद पुत्र उपस्थित होते.त्यांच्या समोर सर्व अटी अजितदादा यांनी सांगितल्या प्रमाणे सविस्तर चर्चा करून बोर्ड मिटिंग घेऊन मान्य करणार आहे. सर्व प्रश्न योग्य आहेत. त्याचे त्यांनी मनापासून स्वागत केले आहे. त्यांनी कारखान्यावर सविस्तर चर्चा साठी बोलवले आहे आणि एमडी साहेब यांच्यावर विश्वास ठेवून व सर्व तरुण शेतकरी यांच्या समोर इच्छा नसताना देखील एमडी यांच्या कडून पाणी पिऊन उपोषण तात्पुरते माघारी घेण्यात आले आहे.असे सुद्धा महेश जेधे यांनी म्हटले.यावेळी विलास बापूराव धायगुडे, ॲड.पृथ्वीराज हनुमंतराव चव्हाण,निखिल लकडे, अमोल जगताप, मनेरभाई,सुनील धायगुडे, प्रकाश बंडगर, संतोष जेधे, विजय धायगुडे, उमेश जेधे, काँट्रॅक्टर जगताप आदी उपस्थित होते.
कारखाना सभासदांना दिवाळीसाठी प्रति सभासद ५० किलो साखर मिळावी. बिगर सभासद (जे सलग ३ वर्ष ऊस देत आहेत) त्यांना सभासद करून घेऊन किमान २० किलो साखर देण्यात यावी.कारखाना कामगारांना ६ महिन्यात कायम स्वरुपी करुन घेऊन किमान ५ लक्ष अपघाती विमा देण्यात यावा.कामगारांना कमीत कमी पगार २७,०००/- रुपये असावा व दिवाळीला १ पगार बोनस द्यावा. ऊस तोडताना ऊस जाळु नये व ऊसतोड कामगारांनी शेतकऱ्यांकडुन तोडण्यासाठी पैसे घेऊ नयेत.गेटकेन ऊसाअगोदर सभासदांचा ऊस तोडण्यात यावा. शेतकरी सभासदांना १ लक्ष अपघाती विमा व २ लक्ष मृत्यु विमा देण्यात यावा.ऊस वाहतुक करताना अपघातग्रस्त व्यक्तींना १ लक्ष दवाखान्यासाठी व मृत्यु झाल्यास २ लक्ष विमा रक्कम देण्यात यावा. निरा डावा व उजवा कालवा अस्तरीकरण संदर्भात संचालक मंडळाने व चेअरमन साहेबांनी आपली भुमिका स्पष्ट करावी.आदी मागण्यांसाठी आंदोलनकर्ते महेश जेधे यांनी आमरण उपोषणाचा मार्ग पत्करला होता.गेली काही महिन्यापासून महेश जेधे हे निरेत विविध प्रश्न आणि समस्या मांडण्याचा प्रयत्न करत आहेत.

# लोहा पोलिसांची १२२ जणांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील रस्त्यामध्ये अडथळा करणारे, सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर मास मटन विकणारे, रोडवर कचरा टाकून घाण करणारे, सार्वजनिक ठिकाणी असभ्यवर्तन करणारे, विना नंबर वाहन चालविणारे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे यांच्यावर काल दि.(२२) आक्टोबर रोजी लोहा पोलिसांनी शहरांमध्ये कारवाईची विशेष मोहीम राबवली. सदरील मोहिमेत रोडवर दुकाने लावणे, हात गाडी लावणे, दुकानाचे सामान लावणे, दुकानासमोर रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहनास व्यक्तीस अडथळा होईल त्रास होईल अशा पद्धतीने कृत्य करताना मिळून आलेल्या एकूण १३ आरोपीवर भारतीय दंडविधान २८३ प्रमाणे १३ गुन्हे दाखल करण्यात आले, तर आपल्या दुकानातील सामान रोडवर अडचण होईल अशा पद्धतीने ठेवणाऱ्या एकूण सहा आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९४९ कलम १०२,११७ प्रमाणे६ केसेस खटले दाखल करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी रोडवर आपल्या दुकानाचा कचरा टाकून शहरात रोडवर घाण केल्याबद्दल महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९४९ कलम ११५,११७ प्रमाणे एका जनावर कारवाई करण्यात आली. लोहा नगरपालिकेने ठरवून दिलेल्या जागेच्या व्यतिरिक्त इतरत्र कोणत्याही ठिकाणी मासाचे दुकान लावणे मटन मास हे उघड्यावर दिसेल अशा पद्धतीत विकणे ठरवून दिलेल्या जागेच्या व्यतिरिक्त विकणे याच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १०५,११७ प्रमाणे मोंढ्यातील तीन आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करत सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन केल्याबद्दल महाराष्ट्र पोलीस अधिनियम ११०,११२,११७ प्रमाणे ३ लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. विना नंबर शहरांमध्ये वाहने चालवणाऱ्या एकूण बारा गाड्या पोलिसांनी आज जप्त केल्या आणि पोलीस स्टेशनला लावल्या. वाहतुकीचे नियम मोडणारे कागदपत्रे न बाळगणारे रोडवर अस्ताव्यस्त गाडी लावणारे यांच्यावर एकूण आज ८४ वाहनधारकावर कारवाई करून ५६ हजार ७०० रुपयांचा दंड करण्यात आला. सामाजिक सार्वजनिक सुरक्षितता स्वच्छता अंतर्गत कारवाई करण्यात आली.

# उपराजधानीत पुन्हा खूनसत्र! चोवीस तासांत दोन हत्याकांड

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर:** उपराजधानीत पुन्हा एकदा खूनसत्र सुरु झाले असून गेल्या चोवीस तासांत दोन हत्याकांडांनी शहर हादरले आहे. पहिल्या हत्याकांडात तीन आरोपींनी दुकानात घुसून व्यावसायिकाला गोळ्या घालून ठार केले तर सक्करदऱ्यातील दुसऱ्या हत्याकांडात चारित्र्यावर संशय घेत पत्नीचा लोखंडी पाईपने हल्ला करून खून केला. दोन्ही घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. पहिल्या घटनेत, 'प्रॉपर्टी'च्या खरेदी-विक्रीच्या वादातून गेस्ट हाऊस मालक जमील अहमद (५२) रा. मोमीनपुरा यांचा गोळी झाडून खून करण्यात आला. ही थरारक घटना बुधवारी पहाटे तीन वाजतच्या सुमारास मोमीनपुरा येथील अल करीम गेस्ट हाऊसमध्ये घडली.

## निधन वार्ता

### नारायणराव बोराडे

**जालना :** मंठा तालुक्यातील आंभोडा कदम येथील



नारायणराव गणपत बोराडे (78) यांचे बुधवारी सकाळी अल्पशःआजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर मूळगावी आंभोडा कदम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात रामेश्वर बोराडे, बाळासाहेब बोराडे ही दोन मुले व मिराताई काकडे ही मुलगी, सुना नातवंडे,असा मोठा परिवार आहे. प्रा. बाळासाहेब बोराडे यांचे ते वडील होते.

### लक्ष्मीबाई नरवाडे

**नांदेड :** तालुक्यातील तुप्पा येथील रहिवासी कै. लक्ष्मीबाई



हिरामण नरवाडे यांचे २५ ऑक्टोबर रोजी वयाच्या ९२ वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तुप्पा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली नातु आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. लोहा तालुक्यातील शेवडी बाजीराव येथील जिल्हा परिषदेच्या केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आनंदा नरवाडे यांच्या त्या मातोश्री होत. अंत्यविधीसाठी संकुलातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# आरोग्य अधिकारी व सर्व कर्मचारी बेमुदत संपावर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी संघटना समायोजन कृती समिती महाराष्ट्र राज्य" मार्फत पुकारलेल्या कामबंद आंदोलनात जिल्हयातील सर्व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचारी (तांत्रिक व अतांत्रिक) व आर. बी. एस. के. तसेच समुदाय आरोग्य अधिकारी यांचा बेमुदत संपात समावेश होणार आहे. त्या साठी "राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी संघटना समायोजन कृती समिती महाराष्ट्र राज्य" तर्फे मुख्याधिकारी जिल्हा परिषद यांना निवेदन देण्यात आले. कृती समिती संघटना मार्फत सर्व आरोग्य संस्थाना निवेदन देऊन आम्ही आंदोलन चा इशारा दिलेला आहे. त्याअनुषंगाने जिल्हयातील सर्व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत येणारे सर्व अधिकारी व कर्मचारी (तांत्रिक व अलाविक ) व आर.बी.एस.के. तसेच समुदाय आरोग्य अधिकारी संघटना मार्फत दि. 26/10/2023 ते बेमुदत संपावर जात आहोत असा इशारा ह्या ठिकाणी देण्यात आला. सर्व अधिकारी, आरोग्य यांचा संपामध्ये सखौल सहभाग असणार आहे त्यामुळे आमच्या गैरहजरीत जिल्हास्तरावर, तालुका स्तरावर तसेच आरोग्यवर्धिनी केंद्र मध्ये काही नैसर्गिक आपत्ती व रोगराई पसरल्यास किंवा आपण प्रकार घडल्यास तसेच काही गैरसोय झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही प्रशासनाची राहील असे ह्या निवेदनात म्हटले आहे.

# माणूस हीच माणुसकी शिकवणारी जात : भदंत पंय्याबोधी थेरो

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शहरात महाबुद्धवंदना

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** पृथ्वीतलावर माणूस हीच एकमेव जात आहे. माणसांमध्ये जाती नसतात; त्या जनावरांत असतात. पशुपक्षांत असतात. वस्तू, पदार्थ, वनस्पती आदींसाठी जाती मानल्या जातात. माणूस हीच एकमेव जात आहे. माणुसकी हाच एकमेव धर्म आहे आणि माणूस हिच माणूसकी शिकवणारी जात आहे असे प्रतिपादन येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ आयोजित महाबुद्धवंदनेच्या कार्यक्रमात केलो. यावेळी भिक्खू संघासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची तसेच शुभ्र वस्त्र परिधान करून बौद्ध उपासक उपासिका, बालक बालिका, युवक युवतींची उपस्थिती होती. पुढे ते म्हणाले की, बुद्धाचा धम्म समानतेचा, करुणेचा आहे. मानवहितैषी आहे. आदी मध्य अंती कल्याणकारी आहे. त्यामुळे हजारो लोक बौद्ध होत आहेत असेही ते म्हणाले. ६७ व्या धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित्त शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ येथील शेकडो युवक युवतींच्या पुढाकाराने पुजनीय भिक्खू संघाच्या उपस्थितीत महाबुद्धवंदनेच्या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे पुष्पवंदन करुन अभिवादन करण्यात आले. उपासकांच्या याचनेवरुन भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या नेतृत्वाखालील भिक्खू संघाने उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले. त्यानंतर त्रिरत्न वंदना घेण्यात आली. भिक्खू संघाच्या आशिर्वचनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका युवा वर्गाची उपस्थिती होती. शेकडो युवक युवतींनी महाबुद्धवंदनेसाठी पुढाकार घेतल्यामुळे आंबेडकरी तरुण आता धम्मचळवळीकडे वळला असल्याचे बोलले जात आहे.

**उपस्थितांकडून बावीस प्रतिज्ञांचे शपथग्रहण :** महाबुद्धवंदनेनंतर उपस्थित बौद्ध उपासक, उपासिका, बालक, बालिका युवक युवतींनी मोठ्या आवाजात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षा प्रसंगी तमाम आंबेडकरी अनुयायांनाना दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे अनुवाचन करण्यात आले. यावेळी भदंत पंय्याबोधी थेरो यांनी भिख्खू संघाच्या वतीने बावीस प्रतिज्ञांचे अनुवाचन केले आणि सर्व उपस्थितांनी उभे राहून त्या ग्रहण केल्या. त्या काटेकोरपणे पाळण्यात याव्यात असे आवाहनही भिक्खू संघाने यावेळी केले.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त अन्नदान वाटप

## नालंदा बुद्ध विहार समिती व अण्णा भाऊ साठे सभागृह समितीचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** नवीन कौठा परिसरातील नालंदा बुद्ध विहार समिती, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सभागृह समिती आणि सप्तरंगी साहित्य मंडळाच्या संयुक्त विद्यमाने 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथ वाचनाचा समारोप व भव्य भोजनदान कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी भंते संघप्रिय, भिक्खूनी आर्याजी, दिलीप कंदकुर्ते, माजी नगरसेवक राजू गोरे, राजकुमार सिंघ गाडीवाले, बालीभाऊ कांबळे, कांचन जोंधळे, प्रज्ञाधर ढवळे, सुनील अनंतवार, प्रकाश ढवळे नागलगांवकर, पंचफुला वाघमारे आदींची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे उद्घाटन दिलीप कंदकुर्ते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. त्यानंतर भगवान गौतम बुद्धांच्या मूर्तीची भव्य रॅली काढून वंदनीय भंतेजी यांच्या हस्ते त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले. समस्त जनास भव्य अस अन्नदान वाटप करण्यात आले



या कार्यक्रमास पंचरंगी धम्म ध्वजारोहण हे मा.नगसेवक राजु गोरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून सप्तरंगी साहित्य मंडळाचे प्रज्ञाधर ढवळे सर व प्रकाश ढवळे यांनी जनतेस मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निष्काम सेवा प्रतिष्ठानचे राजकमलसिंघ गाडीवाले हे उपस्थित होते. त्यांच्या समवेत युवा नेते बाली भाऊ कांबळे व भीम कन्या कांचन राजेश जोंधळे यानी आपली उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमात विशेष सत्कारमूर्ती म्हणून विलास गजभारे सर (क्षेत्रीय कार्यालयीन अधीक्षक मनपा नांदेड झोन क्र ( 6) आणि राष्ट्रीय कलाल गौड युवा संघर्ष समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील भाऊ अनंतवार यांचा मंडळातर्फे बुद्ध प्रतिमा देऊन भव्य सत्कार करण्यात आला. या वेळी यशोधरा महिला मंडळ व नवयुवक भीम जयती मंडळ तसेच मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजक नालंदा बुद्ध विहार समिती लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह समिती व सप्तरंगी साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास प्रभागातील युवक नागरिक तसेच महिलांनी मोठ्या प्रमाणात आपलं परिश्रमरूपी दान करून मंडळास सहकार्य केले.

# 'हामुन' चक्रीवादळ बनले धोकादायक!

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** देशात पहिल्यांदाच एकाच वेळी अरबी समुद्रात "तेज" आणि बंगालच्या उपसागरात "हामुन" अशा दोन चक्रीवादळाची निर्मिती झाली. दरम्यान, बंगालच्या उपसागरात बांगलादेशजवळ सक्रिय असलेले चक्रीवादळ 'हामून' धोकादायक बनले आहे. त्याच्या प्रभावामुळे आज देशातील पाच राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. येत्या बारा तासांत त्रिपुरा, नागालँड, मणिपूर, मेघालय आणि मिझोराममध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. हवामान खात्याने लोकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. २५ ऑक्टोबरला दुपारी या चक्रीवादळाने चितगावच्या दक्षिणेला बांगलादेश किनारा ओलांडला होता. त्याचा वाऱ्याचा वेग ताशी ७५ ते ८५ किमी राहील. सध्या हे वादळ कमकुवत होऊन खोल दबावात रूपांतरित झाले आहे. हे वादळ आज कमकुवत होऊ शकते, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्याच बरोबर आणखी एक समान चक्रीवादळ आंध्र प्रदेश किनारपट्टीपासून उत्तर पश्चिम बंगालच्या उपसागरावर समुद्रसपाटीपासून १.५ ते ३.१ किमी उंचीवर असल्याचे देखील हवामान खात्याने म्हटले आहे. गेल्या २४ तासात लक्षद्वीप, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, आसाम, मेघालय आणि नागालँडमध्ये हलका पाऊस झाला.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर